बुधवार, २९ मार्च २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२०८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 29 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-208 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# गुड न्यूज : पीएफच्या व्याज दरात वाढ

## २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी ८.१५ टक्के व्याजदर

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : पगारदार नोकरवर्गासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या पीएफ रकमेवरील व्याजदरात वाढ करण्यात आली आहे. फायनान्शिअल एक्स्प्रेसनं यासंदर्भातले वृत्त दिले आहे. यासंदर्भात ईपीएफओच्या सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीज अर्थातची दोन दिवसीय बैठक २७ मार्च रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये यासंदर्भातला निर्णय घेण्यात आल्याचे या वृत्तात म्हटले आहे. याबाबत बैठक संपल्यावर केंद्र सरकारकडून अधिकृत पत्रक जारी करण्यात येणार आहे.**




कर्मचाऱ्यांच्या पीएफ रकमेवर २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी ८.०५ टक्के व्याजदर देण्यात येत होता. आता २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी ८.१५ टक्के इतका व्याजदर निश्चित करण्यात आला आहे. देशभरात सध्या जवळपास ५ कोटी पीएफ खातेधारक असून त्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये पीएफवरील व्याजदरात चढ-उतार पाहायला मिळाले. २०१३-१४ मध्ये पीएफवरील व्याजदर सर्वाधिक ८.७५ टक्के इतके होते. २०१८मध्ये ते ८.६५ टक्के करण्यात आले होते. २०१९-२० साठी पीएफवरील व्याजदर ८.५ टक्के होते. २०२०-२१मध्ये हेच दर कायम होते, तर २०२१-२२साठी हे दर ८.१ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले होते. आता या वर्षी त्यात पुन्हा वाढ करण्यात आली आहे.

दरम्यान, व्याजदर जाहीर झाल्यानंतर ती रक्कम खात्यात जमा होईपर्यंतची प्रक्रिया पार पाडणं आवश्यक असतं. CBT च्या बैठकीत शिक्कामोर्तब झालेल्या व्याजदराचा प्रस्ताव अर्थमंत्रालयाला मंजुरीसाठी पाठवला जातो. अर्थमंत्रालयाने त्याला मंजुरी दिल्यानंतर त्यानुसार व्याजदराची रक्कम जमा होऊ शकते. यानुसार, पुढील वर्षी ही रक्कम जमा होण्याची शक्यता आहे.



# अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांना दणका

## २ वर्षांसाठी वकिली सनद निलंबित करण्याचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वकिली गणवेशात आंदोलन करणे अ‍ॅड. गुणरत्न सदावर्ते यांच्या चांगलेच अंगलट आले आहे. बार कौन्सिलने त्यांची सनद २ वर्षांसाठी निलंबित केली आहे. अ‍ॅड. सुशील मणचेकर यांनी यासंदर्भात बार कौन्सिलकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर बार कौन्सिलने पुढील २ वर्षांसाठी सदावर्तेंची वकिली सनद निलंबित करण्याचा निर्णय दिला. त्यामुळे सदावर्तेंना आता २ वर्ष वकिली करता येणार नाही. 'बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा'ने दिलेला निर्णय सदावर्तेंना मोठा झटका मानण्यात येत आहे. गुणरत्न सदावर्ते यांनी वकिलाचा गाऊन आणि बँड परिधान करून मुंबईत विविध आंदोलनात हजेरी लावली होती. तसेच त्या ड्रेसमध्ये त्यांनी विविध प्रकारची घोषणाबाजीही केली होती. आज याबद्दल बार कौन्सिलच्या तीन सदस्यीय समितीने निकाल देत सदावर्ते यांची दोन वर्षे सनद रद्द केली आहे. त्यामुळे आता गुणरत्न सदावर्ते यांना कोणत्याही कोणत्याही न्यायालयात वकिली प्रॅक्टिस करता येणार नाही. वकिसांसाठी एक आचारसंहिता असते. तिचे उल्लंघन करु नये, अशी अट सनद देताना बार कौन्सिल घालत असते. मात्र याच अटींचं उल्लंघन केल्याने बार कौन्सिलने सदावर्ते यांच्यावर २ वर्षांसाठी सनद निलंबित करण्याची कारवाई केली. शिस्तभंगाची कारवाई केली आहे, असे बार कौन्सिलच्या वतीने सांगण्यात आले. दरम्यान, बार कौन्सिलच्या निर्देशाविरोधात गुणरत्न सदावर्ते न्यायालयात धाव घेण्याची शक्यता आहे. याआधीही बार कौन्सिलच्या निर्णयाविरोधात सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

# निम्नदुधना प्रकल्पातील सिंचन योजना कधी सुरु होणार ?

## अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे योजनेचे तीन तेरा; लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश कवडे**

**परतूर :** जालना जिल्ह्यातील दुधना नदीवर ( वाकडी धरण ) निम्न दुधना धरण हा प्रत्कल्प असुन शासनाने करोडो रुपयांची तरतूद करुण एकूण ४ (लिफ्ट ऐरिगेशन) उपसा सिंचन योजनेची निर्मिती केली आहे. त्यापैकी एकही योजना सध्यातरी शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणी वापर करण्यांकरीता सुरू नाहीत. याकडे संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांचे व तालुक्यातील लोकप्रतिनिधींचे ही कमालीचे दुर्लक्ष दिसून येत आहे. सध्या स्थितीत यापैकी श्रीधर जवळा उपसा सिंचन योजनेचे पंपगृह हे मोडकळीस आलेले असून पंपगृहाशेजारील जागेवर काटेरी झाडे वाढले आहेत. त्याचबरोबर मुख्य पंपगुहाकडे जाण्यासाठी पर्यायी मुकलब रस्ता उपलब्ध नाही यावर पाणी वापर संस्था कार्यरत आहे . मात्र ती नावापुरतीच आहे. या योजनेवर अधिकारी वर्गासह येथील लोकप्रतिनींधीचे सर्रास दुर्लक्ष आसल्याचे दिसून येत आहे. या योजना बंद स्वरूपात असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतीला मुकलब पाणी मिळत नाही यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटत आहे. तरी संबंधीत आधिकारी यांनी या योजनेवर वेळीच लक्ष दिल्याने या योजना शेतकऱ्यांकरिता सुरु होतील. तसेच येथील लोकप्रतिनिधी लक्ष्य दिल्यास संबंधित अधिकारी वर्ग कामाला लागतील व पुढील कार्यकाळात या सिंचन योजना सुरु होतील आणी शेतीसाठी पाणी पुरवठा होईल. निम्न दुधना धरणावरील उपसा सिंचन योजना सध्यास्थिती पाहता तरी या योजनेमुळे एकाही शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले नसून कोणत्याही प्रकारचा फायदा झालाच नाही. ऊपसा सिंचन योजना फोल ठरली असून कामचोर कर्मचारी, आधिकारी यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात, यावी अशी मागणी शेतकरी बांधवांकडून होत आहे.





**ऊपसा सिंचन योजना म्हणजे नेमक काय?**

उपसा सिंचन योजनेमध्ये खालच्या पातळीवरील पाणी पंपांच्या सहाय्याने वरच्या पातळीवर उचलले जाते . धरण व कालव्यांची निर्मिती यामुळे धरण पातळीपेक्षा खालची पातळी असलेले मोठ्या प्रमाणावरील क्षेत्र ओलीताखाली आणणे शक्य झाले आहे . परंतु वरच्या पातळीवरील क्षेत्र ओलीताखाली आणणे पाण्याच्या कमतरतेमुळे शक्य झालेले नाही, म्हणून वरच्या पातळीवरील क्षेत्र ओलीताखाली आणणेकरिता उपसा सिंचन योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत .

सरकारने प्रकल्पात संपादीत करण्यात आलेल्या शेतजमिनिच्या शेजारचे क्षेत्र भागातील शेतकरी बांधवांच्या शेतजमिनी या उपसा सिंचन योजनेमुळे ओलिताखाली येतील व तेथील भाग सुजलाम सुफलाम होईल . या योजनेमुळे शेतीला मुकलब पाणी मिळाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल शेतकरी बळकट होईल .

# फडणवीसांच्या आदेशानेच बंडाला सुरुवात : सावंत


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत आहेत. भाजप आणि इतर पक्षातील नेते वारंवांर काही ना काही गौप्यस्फोट करत आहेत. अशातच आता राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी देखील एक गौप्यस्फोट केला आहे. बंडासाठी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्याबरोबर मी तब्बल दीडशे बैठका केल्या आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानेच बंडाला सुरुवात झाल्याचा गौप्यस्फोट तानाजी सावंतांनी केला आहे. परंडा शहरात कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले होते. त्या कार्यक्रमात सावंत बोलत होते.

राज्यात सत्तांतरासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर अनेक बैठका केल्या आहेत. या बंडासाठी मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील आमदाराचे मी काऊन्सलिंग करत होतो. या सर्व गोष्टी मी सांगून करत होतो. कुठलीही गोष्ट झाकून केली नाही असेही सावंत यांनी सांगितले. सावंत यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ निर्माण झाली आहे. राज्यात 2019 ला महाविकासआघाडीचं सरकार आल्यानंतर सत्ता बदलायचे आमचे कामचे काम सुरु होते. शिंदे - फडणवीस यांच्यासोबत 100 ते 150 बैठका झाल्याचे तानाजी सावंत म्हणाले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# हरवलेल्या रानवाटा



पण मी तिथे पोहोचलो तेव्हा तिथे ना ती विहीर आढळली ना ते चिंचेचे झाड ! ती शेतीही दुसऱ्या कोणी तरी विकत घेतली होती. मी त्या माणसाला भेटलो. त्याला ओळख सांगितली. म्हटलं, ' एके काळी ही आमची शेती होती. इथे त्या कोपऱ्यावर एक चिंचेचे झाड होते. एक छानशी विहीर होती त्याच्याजवळ. ' पण त्या माणसालाही चिंचेचे झाड आठवेना. काळ सगळ्या खुणा कशा पुसून टाकतो ! त्या विहिरीच्या जागी मात्र एक प्रचंड मोठी विहीर बांधून काढलेली आढळली. तिच्यावर आता पाण्यासाठी इलेक्ट्रिकची मोटर बसवलेली होती. पूर्वी याच विहिरीवर आमची मोट चालायची. ढवळ्यापवळ्याची जोडी मोट ओढायची. पाणी खळाळत बांधातून पिकाकडे धावत जायचं. मोटेच्या चाकाचा ' कुई कुई ' असा आवाज यायचा. ' साधी माणसं ' या चित्रपटातल्या ' माळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं पाणी जातं ...' या गीताची आठवण यावी असं ते दृश्य असायचं. पण काळाच्या ओघात सगळंच बदललं ! मग गावात गेलो. दक्षिणेकडून गावात प्रवेश करताना डाव्या बाजूला कोपऱ्यात आमची शाळा होती. एके काळी सुंदर कौलारू असणारी या शाळेचे रंगरूप आज बदललेलं दिसत होतं. आजूबाजूला दोन तीन छोट्या छोट्या खोल्या निर्माण झाल्या होत्या. याच शाळेने मला लहानपणी घडवले होते. तिथे बसून सुरुवातीचे धडे मी गिरवले होते. बालमित्रांना गोष्टी सांगितल्या होत्या. इथेच आम्ही कधी खेळलो होतो, भांडलो होतो. सगळ्या सगळ्या आठवणी जाग्या झाल्या. जिथे आमचं घर होतं ती जागा आता उघडीबोडकी पडलेली होती. एके काळी इथेच बालपण गेलं होतं. खूप साऱ्या आठवणी त्या जागेशी निगडित होत्या. पण आता त्या जागेची झालेली अशी अवस्था पाहवत नव्हती. मागेपुढे प्रशस्त आंगण, दोन दारे, लाकडी छत असलेले मातीचे ते प्रसन्न घर खऱ्या अर्थाने मातीला मिळाले होते. त्याची ही अवस्था बघवत नव्हती. गावाच्या बाहेरच्या वेशीजवळ एक मारुतीचे मंदिर होते. मंदिराभोवती एक उंच असा पार होता. मंदिराच्या बाहेर एक मोठे पिंपळाचे झाड होते. गावकऱ्यांनी मंदिर मात्र आता नवीन बांधले होते. उघडा पार जाऊन बंदिस्त आवार निर्माण झाले होते. मंदिराच्या बाहेर असणारा तो प्राचीन पिंपळवृक्षही आता नव्हता. गावकऱ्यांनी त्याच्या जागी पिंपळाचे एक नवीन कलम केलेले झाड लावले होते. ते झाड जणू मला सांगत होते. ' अरे बदल हा जगाचा स्थायीभाव आहे. या जगात नित्यनूतन अशी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे बदल ! तेव्हा असा निराश होऊ नकोस. जुने जाऊन त्या जागी नवीन येणारच. ' त्या पिंपळाची हिरवी, सोनेरी, पोपटी पाने वाऱ्यावर सळसळत होती. मला आश्वस्त करीत होती. कुठेतरी रेडिओवर किशोरकुमारचे गाणे ऐकू येत होते, ' ये जीवन हैं, इस जीवन का यही हैं यही हैं रंगरूप...! '



# आनंदी पहाट

## गतकाळात रममाण होण्यातील आनंद

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मी असे केले होते, तसे केले होते, माझ्यासारखे कोणी काही करूच शकले नव्हते, माझ्याकडे एवढा पैसा होता, मी सर्वांत अधिक व्यवसाय केला होता. वगैरे वगैरे.... ह्या सर्वच घटना भूतकाळातल्या असतात, त्याचेच आपण सदोदित कौतुक करत रहात असतो. भूतकाळाचे भूतच जणू काही आपल्या मनाचा ताबा घेऊन सर्वत्र टेंभा मिरवत असते. वर्तमानातल्या मीचा त्यामुळेच आपल्याला विसर पडलेला असतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे? आणि ते सुद्धा का? ह्याचा प्रकर्षाने आणि प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते. मी कालच्या पेक्षाही आज सरस, प्रगत होणे आवश्यक आणि म्हणूनच महत्वाचे असते. आपल्या आयुष्यातील गत काळात रममाण व्हायला आपल्याला प्रत्येकालाच हवे असते, ते अधिक प्रियही असते. आपल्या प्रत्येकाच्याच साठवणीतल्या अनेक आठवणी असतात. हर्षाच्या-स्पर्शाच्या, घरच्या-दारच्या, प्रीतीच्या-मैत्रीच्या, स्पर्धेच्या-बक्षिसांच्या, शाळेच्या-कॉलेजच्या, बालपणीच्या-तारुण्याच्या; अशा एक नाही तर अनेकविध आठवणीत आपल्या अंतर्मनाला सुखावण्यासाठी अनेकदा त्या आपण स्मरत असतो. ह्यांत काही आठवणी सुखाच्या-दुःखाच्या, रागाच्या-वादाच्या, विरहाच्या-प्रहाराच्या, प्रयासाच्या-त्रासाच्या, मानाच्या-अपमानाच्या अशा मिश्र स्वरूपाच्याही असतात. कोणत्या आठवणी आपल्या अंतर्मनासमोरून कधी तरळून जातील, हे काही ठरलेले अथवा आपण ठरवलेले नसते.



आधुनिक केसरी

**शांती समाधाना | वान नाही ||**
चित्त शुद्ध ठेव | धावू नको मना ||
हरिच्या चरणा | स्थिर होय ||१||
क्षणोक्षणी काळ | आवळतो फास ||
याचे भान खास | ठेव जरा ||२||
प्रारब्धाचे भोग | भोगोनिया झाले ||
समत्व साधले | सुख-दुःखा ||३||
संसाराचे खूळ | व्यवहारी सोडावे ||
परमार्थी जोडावे | शुद्ध भावे ||४||
हरिचरणाशी | लीन होता मना ||
शांती समाधाना | वान नाही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

जनानां स्निग्धता चापि
धन्यता मान्यता तथा।
लभते च यशः श्रेयः
कृपया युवयोः सदा॥5॥
तुमच्या दोघांच्या कृपेने त्याला लोकांचा स्नेहभाव तसेच धन्यता मान्यता यश आणि श्रेय त्याला लाभते.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

मान बद्ध जग में करे, साधू चाह न मान ।
जिवन मृतक हरि को भजे, जग से रहे अमान ।।२८।।(स्वर्वेद तृतीय मण्डल नवम अध्याय) ०३/०९/२८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मान-प्रतिष्ठा हे संसाराचे बंधन आहे. म्हणून वैराग्यवान पुरुष सन्मानाची इच्छा ठेवत नाहीत; जगात अमानी, जीवन्मृतक होऊन परमेश्वराची भक्ती करतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

# देहांन्तनिरूपण

आधुनिक केसरी




जसे की दिवसरात्र, पोर्णीमा अमावस्या, रोग आरोग्य, घरात आहोत की अरण्यात, दक्षिणायन आहे की उत्तरायणं, एकटा आहे की सभोवताली माणसं आहेत. काहीच कळत नाही. अशा प्रकारे संत देहात रहातो खरा पण देहाशी संबंधित सर्व वासना संपलेल्या असतात. कशाची आसक्ति उरलेली नसते. आत्मसाक्षात्कार होण्यासाठी संतांच्या संगतीत रहावे, चांगले ते बोलावे, आदर्श वर्तन असावे चांगले श्रवण करावे. सद्गुरुचे विचार सतत मनात ठेवावे. म्हणजे आत्मसाक्षात्कार होतो. आपणं जे जे पहातो त्या द्रुष्य वस्तुंचा पगडा मनावर बसलेला असतो. त्यामुळे होते काय की खरे नसेल ते खोटे वाटते, खोटे असलेले खरे वाटते. हा विरोधाभास टाळण्यासाठी मनाची एकाग्रता आवश्यक आहे कुठल्याही प्रलोभनाला बळी न जाण्याचं सामर्थ्य सत्संगात राहुन होते. मन सतत जागृत रहाते. अशी सगुणोपासना वाढीस लागलेली माणसं आजुबाजुला असतील तर समाज कल्याणकारी झाल्याशिवाय रहाणार नाही. असत्याला याठिकाणी अजिबात थारा नसतो. राखावी बहुतांची अंतरे भाग्य येईल तद्नंतर एकमेकांना समजून घ्यायला हवे. उगाचं राईचा पर्वत करून आयुष्याची आपली व दुसऱ्याची नासाडी करू नये. असत्य सत्यरूपाने एकदा मनात घर केले की मग कोणीही न शिकवता ते मनात पक्के बिंबवले जाते. वेदशास्त्र, पुराणे,अशा अनेक प्रकारच्या विवेचनात सत्याचे स्वरूप अगदी पोटतिडकीने सांगतात. तरी या सत्यस्वरूपाची आपल्याला प्रचिती येत नाही. सत्य प्रत्यक्ष असून ते झाकले गेले आणि जे सत्य नाही ते मात्र सत्यपणाने मिरवत आहे. मित्रांनो आपणं आपल्या दैनंदिन जीवनात तर हरघडी हे बघतं आलो आहेत. बेताल वागणे,बोलणे,याला प्रतिष्ठा मिळत आहे. समाजाचा हा विषारी साप आपण सर्वांनी संत सहवासाने वेळीचं बाजूला काढला पाहिजे. सर्व भौतिक गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे ते कमी केले पाहिजे. सन्मार्ग,सदाचार,सद्विचार, सदवर्तन याची सतत जाणीव ठेवली तर रामराज्य येण्यास वेळ लागणार नाही.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# प्रापंचिक माणसाची स्थिती कशी असते ?

आधुनिक केसरी



सर्व संतांनी भवरोगावर खात्रीचे औषध सांगितले आहे. सर्व संत आपापल्या परीने मोठेच आहेत. पण त्यांतल्या त्यांत समर्थांनी आपली जागा न सोडता, विषयी लोकांचे चित्त कुठे गुंतलेले असते हे पाहिले आणि मगच रोगाचे निदान केले. आमचा मुख्य रोग संसार दुःखाचा असून तो सुखाचा आहे असे वाटते, हा आहे. रोग कळून आला पण औषध जर घेतले नाही तर तो बरा कसा होणार ? रोग असेल तसे औषध द्यावे लागते. अजीर्णाने पोट दुखते ते भुकेने दुखते असे वाटून आम्ही अधिक खाऊ लागलो तर कसे चालेल ? संसार ज्याला दुःखाचा वाटतो त्यालाच परमार्थमार्गाचा उपयोग ! एखादा दारू पिणारा मनुष्य दारूपायी आपले सर्वस्व घालवतो. दारूचा अंमल नसतो त्या वेळी तो शुद्धीवर येतो. आणि त्याला आपल्या बायको-मुलांची काळजी वाटते. आपला प्रपंच नीट व्हावा असेही त्याला वाटते. पण त्याच्या बुद्धीला त्यातून मार्ग सुचत नाही. मग तो पुनः इतकी दारू पितो की त्यात त्याला स्वतःचा विसर पडतो; आणि अशा रीतीने तो स्वतःचा नाश करून घेतो. अगदी याचप्रमाणे प्रापंचिक माणसाची स्थिती होते. पहिल्यापहिल्याने प्रपंच बरा वाटतो, मनुष्य त्यात रमतो. पुढे काही दिवसांनंतर तो थकतो, त्याची उमेद कमी होते, आणि म्हणून, आता आपल्या हातून परमार्थ कसा होणार असे त्याला वाटते. पण नंतर तो पुनः जोराने प्रपंच करू लागतो, आणि शेवटी हीन अवस्थेत मरून जातो. जो जगाचा घात करतो तो एका दृष्टीने बरा, कारण जग स्वतःला सांभाळून घेईल; पण जो स्वतःचा घात करून घेतो त्याला कोण सांभाळणार ? तो फार वाईट समजावा. केवळ प्रापंचिक हा असा आत्मघातकी असतो. खोटे कळूनही त्यात सुख मानून तो राहतो, आणि देवाने जे निर्माण केले ते माझ्या सुखाकरिताच केले असे समजून मरेपर्यंत त्यातच गुरफटून जातो. मनुष्य तेच तेच करीत असूनसुद्धा त्याला त्याचा कंटाळा कसा येत नाही ? कालच्या गोष्टीच आपण आज करतो. आपल्या लक्षात जरी आले नाही तरी त्या गोष्टी झालेल्याच असतात. तेच ते जेवण, ती नोकरी, तोच तो पैसा मिळविणे, सगळे तेच ! असे असताना माणसाला कंटाळा का येऊ नये ? याचे कारण असे आहे की, विषय अत्यंत गोड तरी असला पाहिजे, किंवा हावेला तृप्ती तरी नसली पाहिजे. या दोन कारणांपैकी दुसरे कारणच खरे आहे; आपली हाव पुरी झाली नाही हेच खरे आहे. विषयामध्ये सुख आहे ही आपण कल्पना केली. त्याचा अनुभव अनेक वेळा घेतला. तरी अजून आपली कल्पना ही खरी की खोटी हे आपल्याला कळत नाही, हे मात्र और आहे. जो मनुष्य प्रपंचातला आपला अनुभव जमेस धरत नाही , तो कशानेच शहाणा होत नाही.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २९ मार्च २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari



राजस्थानी मल्टीस्टेट

मल्टीस्टेट

कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट

को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ

बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी

संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING

www.rajasthanimultistate.in

Powered by Tatkal Banking

आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा

* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा


# आ. संजय शिरसाट यांच्या विरोधात तीव्र आंदोलन

## अश्लील भाषेत महिलांचा अपमान करणाऱ्या शिरसाटचं करायचं काय खाली मुंडकं वर पाय

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शिंदे गटाच्या शिवसेनेचा मेळावा नुकताच शहरांमध्ये पार पडला या मेळाव्यात आमदार संजय शिरसाठ यांनी शिवसेनेच्या( उ.बा.ठा) उपनेत्या सुषमाताई अंधारे यांच्या विषयी अश्लील अपशब्द वापरल्यामुळे शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त करत असून आज महिला आघाडीच्या वतीने क्रांतीचौकात तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी संजय शिरसाट यांच्या तोंडाला शेण लावून, त्याचप्रमाणे संजय शिरसाठ यांच्या फोटोला जोडे मारून महिलांनी आपला संताप व्यक्त केला. महिलांचा अवमान करणाऱ्या शिंदे सरकार हाय हाय, संजय शिरसाट हाय हाय, संजय शिरसाटच करायचं काय खाली मुंडक वर पाय, पन्नास खोके खाऊन खाऊन माजलेत बोके या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. महिलांनी हातात काळे झेंडे घेऊन निषेध व्यक्त केला. यावेळी जिल्हा संघटिका प्रतिभा जगताप यांनी शिंदे सरकारमधील मंत्री लोकप्रतिनिधी कायम महिलांच्या बाबतीत अपशब्द वापरत असतात या आधी सुद्धा राष्ट्रवादीच्या




खासदार सुप्रिया सुळे यांच्याविषयी मंत्री अब्दुल सत्तार यांनी, सुषमाताई अंधारे यांच्या विषयी मंत्री गुलाबराव पाटील यांनी आता परत सुषमाताई अंधारे यांच्या विषयी संजय शिरसाठ यांनी अश्लील भाषेमध्ये गरळ ओकली आहे, यावरून शिंदे सरकारमधील लोकप्रतिनिधींचे संस्कृतीचे दर्शन महाराष्ट्राला घडत असून अशा प्रकारे शिंदे सरकारमधील लोकप्रतिनिधी महिलांचा अपमान करत असतील तर आम्ही महिला हे कदापी सहन करणार नाही, याहीपेक्षा तीव्र आंदोलन करू, आम्ही बाळासाहेबांच्या तालमीत घडलेल्या शिवसेनेच्या रणरागिणी आहोत, वेळ पडली तर यांच्या तोंडाला काळे फासायलाही मागे पुढे पाहणार नाही असा इशारा प्रतिभा जगताप यांनी दिला. या आंदोलन प्रसंगी उपजिल्हा संघटिका अनिता मंत्री, दुर्गा भाटी, शहर संघटिका विद्या अग्निहोत्री, अशा दातार, सुनिता सोनवणे, विधानसभा संघटिका मीरा देशपांडे, मीरा पाटील, सुचिता आंबेकर,सुकन्या भोसले, सारिका शर्मा, लता त्रिवेदी, मीना थोरवे, विद्या खाडीलकर, मीरा चव्हाण, स्मिता रामचंद्र, छाया जाधव, मीनल राणे, सविता आंभोरे, विमल आव्हाड, शोभा बडे, कांता गाडे, इंदिरा कदम, आशा भामरे, मीरा कदम, प्रेम लता चंदन, प्रतिभा राजपूत, उषा कोरडे, सुनिता गरुड, आरती साळुंखे, मनीषा खरे ,रेखा शाह ,नीता शेळके, संध्या रावलेलू, रोहिणी काळे, संगीता पवार, वैशाली आरट ,कमल भरड, भारतीय हिवराळे, मंदा भोकरे, रेणुका जोशी, कविता मठपती, प्रेम लता चंदन आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# जिंतूर तालुकाप्रमुखपदी ॲड. सुनील बुधवंत

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे साहेब (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशाने, आ.संतोष बांगर साहेब यांच्या मार्गदर्शनाने तसेच परभणी जिल्हा प्रमुख व्यंकटराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि धम्मदीप रोडे यांच्या उपस्थितीत परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यासाठी तालुकाप्रमुख पदी ॲड. सुनिल शिवाजी बुधवंत, तालुका संघटक पदी अंकुश सीताराम राठोड, महिला तालुकाप्रमुखपदी अक्षता राजेश चक्कर पाटील तर युवा शहराध्यक्षपदी श्री. गजानन ज्ञानदेव गीते यांची नियुक्ती करण्यात आली.

ठाणे येथील शिवसेनेच्या मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्ध झालेल्या नियुक्ती पत्रावर शिवसेना सचिव संजय भाऊराव मोरे साहेब यांची सही असून नियुक्ती बद्दल त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

सर्व कार्यकर्त्यांना एकजुटीने सोबत घेऊन जिंतूर कार्यक्षेत्रात पक्ष वाढीसाठी 'गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक' ही मोहीम आखत काम करणार असल्याचे ॲड. सुनिल बुधवंत व इतर पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले. याप्रसंगी राजेश तातेराव चक्कर पाटील, यादवराव थिटे, संदीप खंडेराव आघाव, प्रल्हाद ज्ञानदेव गीते, अक्षय माणिकराव जायभाये, योगेश जगन्नाथ राठोड, कार्तिक यादवराव थिटे, अशोक मधुकरराव देशमुख, छत्रपती मथुरा राठोड, बापूराव आश्रोबा चौरे, राजाभाऊ शिंदे, डॉ. गजानन गाडेकर यांची उपस्थिती होती.




# भाजप- सपा आमनेसामने

आधुनिक केसरी

उत्तर प्रदेशचा राज्य पक्षी सारस क्रौंच या वन्यपक्ष्यामुळे भाजपा आणि सपा या दोन पक्षांत शाब्दिक वाद उफाळला आहे. काही दिवसांपूर्वी मोहम्मद आरिफ या युवकाने एका घायाळ सारस क्रौंच पक्ष्याची शुश्रूषा केली होती. त्यानंतर या दोघांमध्ये मैत्रीचे नाते निर्माण झाले. सारस क्रौंच पक्षी हा संरक्षित वन्यप्राण्यांच्या यादीत येत असल्यामुळे उत्तर प्रदेशच्या वनविभागाने सारस क्रौंचला आरिफकडून ताब्यात घेतले आणि वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत आरिफवर गुन्हा दाखल केला. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर आता भाजपा आणि सपा पक्ष आमनेसामने आले आहेत. मोहम्मद आरिफ याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर अखिलेश यादव यांनी रविवारी भाजपावर जोरदार टीका केली. अखिलेश यांच्या टीकेनंतर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष भूपेंद्र सिंह चौधरी यांनीदेखील यादव यांच्यावर आरोपांची राळ उठवली. सपाचे प्रमुख यादव हे आरिफचे नाव आणि सारस क्रौंच पक्ष्याच्या आडून राजकारण खेळत आहेत, असा आरोप चौधरी यांनी केला. तर यूपीचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सोमवारी (दि. २७ मार्च) राज्य पक्षी सारस क्रौंच आणि राज्य प्राणी बाराशिंगा यांच्यासाठी विशेष राखीव पार्क उभारण्याची घोषणा केली.या प्रकरणाची सुरुवात फेब्रुवारी २०२२ मध्ये झाली. ३५ वर्षीय आरिफने एका जखमी सारस क्रौंच पक्ष्याला आपल्या घरी आणून त्यावर उपचार केले. तब्बल १३ महिने हा पक्षी त्याच्यासोबतच होता. दरम्यान दोघांच्या मैत्रीचा विषय सर्वदूर पोहोचला. दोघांचे व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल होऊन चर्चेचा विषय ठरले. ५ मार्च रोजी समाजवादी पक्षाचे नेते, माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांनी आरिफच्या घरी भेट देऊन त्याची आणि क्रौंच पक्ष्याची मैत्री अनुभवली. या भेटीचे काही फोटो अखिलेश यांनी ट्विटरवर पोस्ट केले. २१ मार्च रोजी, वनविभागाच्या लोकांनी आरिफच्या घरी धाड टाकून सारस क्रौंच पक्ष्याला ताब्यात घेतले आणि त्याची रवानगी रायबरेली येथील समसपूर येतील पक्षी अभयारण्यात केली. अखिलेश यादव यांनी आरोप केला की, मी आरिफच्या घरी भेट दिल्यामुळेच ही कारवाई करण्यात आली आहे. मात्र वनविभागाने हे आरोप फेटाळून लावले. आरिफकडील सारस क्रौंच पक्षी दुसऱ्याच दिवशी अभयारण्यातून निसटला आणि जवळपास अर्धा किलोमीटर दूरवर काही शेतकऱ्यांना आढळला. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी कुत्र्यांपासून त्याला वाचविले. शनिवारी (दि. २५ मार्च) या पक्ष्याला कानपूरमधील प्राणिसंग्रहालयात हलविण्यात आले. अखिलेश यादव यांनी आरिफ आणि पक्षाच्या काही नेत्यांसोबत लखनऊ येथे रविवारी पत्रकार परिषद घेतली. या वेळी ते म्हणाले, "आरिफने मला मतदान केले. तुमचे आरिफशी वैर असू शकते, पण सारस क्रौंच पक्ष्याशी तुमचे वैर कशासाठी? त्या पक्ष्याने मला मतदान केलेले नाही. तुमची लढाई समाजवाद्यांशी आहे.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# खासदार -आमदारांचे आर्थिक लाड थांबवा!

आधुनिक केसरी

**देशातील राज्य सरकारे मोफत व सवंग घोषणा करत असल्याने त्या राज्यांचा खर्च वाढत चालला आहे,हे राज्ये आर्थिक संकटात आहेत एकीकडे शेतकरी व गरीबांना मदत देण्यासाठी निकष लावले जातात. दुसरकीडे सरसकट खासदार व आमदारांना वेतन,निवृत्ती वेतन,सवलती दिली जात आहेत.अनेक लोकप्रतिनिधी, करोडपती आहेत. यांचेसाठी निकष कोणते आहेत?आता खासदारांच्या १ एप्रिल २०२३ मध्ये वेतनात वाढ लागू होणार आहे.केंद्र व राज्य सरकार अश्या लोकप्रतिनिधींचे लाड का करते आहे? लोकप्रतिनिधी हे 'भस्मासूर' होत चालले आहेत काय? देश व राज्य वाचेल काय? तेंव्हा याला लगाम घातला गेला पाहिजे.**

याची सुरुवात पुरोगामी महाराष्ट्रापासून व्हायला हवी! जनतेने या विरोधात आवाज उठविला पाहिजे. संसदीय लोकशाही पध्दतीत खासदार व आमदार हे लोकांचे प्रतिनिधी व विश्वस्त म्हणून निवडून येतात! जनतेच्या हिताचे कायदे व योजनाव्दारे त्यांना लाभ देण्याचे काम करणे अपेक्षित असते! त्यालाच लोकसेवक संबोधले म्हंटले जाते! मोदी हे स्वत : ला पंतप्रधान "सेवक' म्हणतात. त्यांनी 'ना खाऊंगा ना खाने देऊँगा'अशी भीष्म प्रतिज्ञा केली आहे.यातून भ्रष्ट विरोधी पक्षाच्या नेत्यावर कारवाई केली जात आहे.देशातील सर्वच पक्षाच्या खासदार व आमदारांच्या संपत्तीत वाढ होत असल्याची माहिती निवडणूक प्रतिज्ञापत्रातून सामोर येत आहे.देशात लोकसभेच्या २६ व राज्यसभेच्या ११ व २५७ आमदारांच्या संपत्ती वाढ झाल्याची लोकप्रहरी या स्वंयवसेवी संस्थेने सर्वेक्षणानुसार दिली आहे.देशात करोना काळात हिमाचलप्रदेशात ४९ आमदारांच्या संपत्तीत ११६७ टक्के वाढ झाली. गुजरात राज्यात १८२ पैकी १५१ आमदार कोट्यधीश आहेत.यात भाजपासह काँग्रेस,आम आदमी व अपक्ष आहेत. मध्यप्रदेश- काँग्रेस ७९ टक्के, भाजपा- ८४ टक्के, राजस्थान- काँग्रेस ८३ टक्के, भाजपा-७९ टक्के, तेलंगणा- भारत राष्ट्र समिती- ७४ व इतर पक्षाचे १०० टक्के तर मिझोराममधील सर्व आमदार श्रीमंत आहेत.उत्तरप्रदेश राज्यात भाजपा ३०४ पैकी २३५ तर सपाचे ४९ पैकी ४२ तर बसपा १६ पैकी १५ तर काँग्रेसचे ७ पैकी ५ आमदार करोडपती आहेत.तर महाराष्ट्रात २८८ पैकी २६४ आमदार कोट्यधीश आहेत.म्हणजे हे प्रमाण ९३ टक्के आहे. यात चार आमदार देशात सर्वाधिक श्रीमंत आहेत.यात काँग्रेसचे ९६ टक्के, भाजपा-९५ टक्के, शिवसेना- ९३ टक्के राष्ट्रवादी काँग्रेस -८९ टक्के आमदार श्रीमंत आहेत. तसेच ५० आमदारांची संपत्ती ५० लाख ते २ कोटी पर्यंत तर केवळ ५ आमदारांची संपत्ती १०ते ५०लाखापर्यंत आहे. खासदार व आमदार यांच्या संपत्तीत उत्पन्नापेक्षा संपत्ती वाढ होत आहे, अशी केंद्रीय प्रत्यक्ष कर बोर्डाने ( सी.बी. टी.टी. ) दिलेली आहे. अश्या लोकप्रतिनिधींच्या संपत्तीची चौकशीअयकर विभागामार्फत होत आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९४७ मध्ये सुधारणा करण्यात आली.या १९५२ या कायद्यात १९६१ व १९६५ चा पब्लिक ड्युटी व 'पब्लिक सर्व्हंट'चा समावेश करण्यात आला. लोकसेवकपदाचा गैरवापर करून संपत्ती मिळवत असतील व मौल्यवान वस्तु घेत असतील कलम १३ नुसार त्यांचेवर भ्रष्टाचाराची कारवाई करू शकते. आज विरोधी पक्ष नेत्यावर ज्या कारवाया होत आहे.याच कायद्याचा आधार आहे. देशातील पहिल्या लोकसभा निवडणुकीत नांदेड लोकसभा मतदार संघातून देवरावजी कांबळे यांचा २५० रूपये प्रचारावर खर्च केला होता व ते निवडून आले होते. यावरून देशात राजकीय पक्षाचा निवडणूक प्रचाराचा खर्च लक्षात येतो. केंद्रीय निवडणूक आयोगाने २०२२ मध्ये लोकसभा मतदार संघात निवडणूक प्रचार खर्च मर्यादा ७० लाखावरुन ९५ लाख रूपये तर विधानसभा मतदार संघात २८ लाखावरुन तो ४० लाखा- रूपयापर्यंत वाढविला आहे.महाराष्ट्रातील कसबा व पिंपरी चिंचवड या विधानसभा मतदार संघातील पोटनिवडणुकीत ही खर्चाची मर्यादा लागू करण्यात आली.वास्तविक निवडणुकीत उमेदवारांचा छूपा खर्च करोडो रूपायांचा असतो. देशातील प्रत्येक निवडणूक ही पैसा,जात,धर्म या तीन विषयावर लढविली जाते.तसेच 'नोट 'दो वोट दो' चपटीचे ( दारू ) आमिष दाखविले जाते. यामुळे भ्रष्ट राजकीय नेते घेवून निवडून येतात! नंतर पाच वर्षे लुटतात. सामान्य माणूस निवडणुकीत उभा राहण्याचा विचारही करु शकत नाही. त्यात पक्षाचे नेते सत्ता मिळविण्यासाठी सवंग घोषणा करू लागलेला आहे. वीज, पाणी, धान्य आदी मोफत देण्याच्या घोषणा केल्या जात आहेत. राज्यात नैसर्गिक आपत्ती, राष्ट्रीय महामारी संकटात सापडलेल्या गरीब व शेतकऱ्यांना मदत सरकारने मदत करणे अपेक्षित आहे. पण सरसकट मोफत,सवलती, अनुदान, कर्जमाफीमुळे राज्याच्या खर्च वाढत जातोय! याकडे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे अनेक राज्य कंगाल होत चाललीय! तत्कालिन अंर्थमत्री व काँग्रेस नेते शंकरराव चव्हाण यांचे कर्जमाफीमुळे अर्थ व्यवस्थेवर परिणाम होईल,असे त्यांचे स्पष्ट मत होते. पण आज आम आदमी पक्ष प्रत्येक निवडणुकीत सवंग घोषणा करत आहे. काँग्रेस पक्ष त्याच पाऊलावर पाऊल टाकत आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम १०६ व आणि १९५ नुसार खासदार, आमदारांना वेतन, भत्ता, सवलती, कार्यालयीन खर्च देण्यात येतात. हे लोकप्रतिनिधी वेतन कायदा १९५४ हे वेतन,सोयी दिल्या जात आहेत. मोदी सरकारने खासदारांचा स्वतः ला वेतन वाढ करण्याचा अधिकार काढला आहे. तो महागाई निर्देशांकाशी जोडला आहे. त्यामुळे दर पाच वर्षांनी त्यांचे वेतनात आपोआप वाढ होते. आता १ एप्रिल २०२३ मध्ये नवीन वेतन वाढ लागू होणार आहे. मोदी सरकारने खासदार- आमदारांचे वेतन बंद करण्याचा धाडस अजून तरी केले नाही. कारण भाजपाही खासदारही नाराज होतील, याची भीती वाटत असावी. देशात विविध राज्यात आमदारांना वेतन दिले जाते.त्यात तेलंगणा, दिल्ली, उत्तरप्रदेश, जम्मू- काश्मिर-उत्तराखंड, आंध्रप्रदेश, हिमाचल प्रदेश, राजस्थान, गोवा, हरियाना,पंजाब, मध्यप्रदेश, छत्तीसगड, बिहार, पश्चिम बंगाल, तामीलनाडू या राज्यात २.५० लाख १.१० लाख वेतन मिळते, तर कर्नाटक, सिक्कीम, केरळ, गुजरात, ओडिसा, मेघालय, पांडेचरी, आसाम, मिझोराम, मणीपूर, नागालँड, त्रिपूरा या सर्व राज्यात ९० हजार ते ४० हजारपर्यंत आमदारांना वेतन मिळते. तर आम आदमी पक्ष राजकीय परिर्वतन करण्याचे उद्देशाने राजकाणात आला.या पक्षाने आमदारांच्या वेतनात प्रतिमहिना ९० हजार वाढ केली. ही वाढ ६६ टक्के आहे.या पक्षाला भ्रष्ट पैश्याची चटक लागली आहे. महाराष्ट्रात १९७७ मध्ये आमदारांना २५० रूपये वेतन मिळत असे. आता त्यात दोनशे टक्यांनी वाढ झालेली आहे. आता त्यांना एकूण २ लाख ७१ हजार प्रति महिना मिळतात. त्याशिवाय इतर सवलती आहेत. त्यात तीनशे आमदारांना ७० लाखाचे घरे दिली जाणार आहेत, तसेच वैद्यकीय उपचारातील ९० टक्के खर्च शासन देत असते, करोना काळात काही आमदारांनी खासगी रूग्णालयात उपचार करून शासनाकडून पैसे वसूल केले आहेत. तसेच त्यांना गाडी घेण्यासाठी १० लाख बिनव्याजी दिले जातात.त्याच प्रमाणे २०२२-२३ मध्ये यांना आमदार निधी हा पाच कोटी करण्यात आला आहे. यात त्यांची टक्केवारी ठरलेली असते.ही कामे नियोजन विभाग त्यांच्या सल्यानुसार देत असते.यात निविदा काढण्यात पळवाट आहेत. यात सर्वच जण टक्केवारी घेतात असे नसले तर प्रमाण अधिक आहे. जिल्हा नियोजन विभाग याबाबतची कमालीची गुप्तता पाळत असते. राज्यात निराधार , वृध्द व्यक्तींना निवृत्ती वेतन एक हजार ते दीड हजार प्रतिमहिना देण्यात येते. तर शेतकऱ्यांना प्रतिना दोन हजार रूपये देण्यात येणार आहेत. यासाठी उत्पन्न व आदी निकष तपासून वेतन दिले जाते. मग खासदार व आमदारांना निवृत्ती वेतन देण्यासाठी कोणते निकष आहेत ? जनतेचे हे विश्वस्थ भक्षक बनत चालले आहेत.लोकप्रतिनीधी जर स्वतः च्या हितासाठी कायदे व नियम करून सरकारी तिजोरीवर डल्ला मारीत असतील तर तो भ्रष्टाचार नाही काय ? लोकप्रतिनिधी "भस्मा रोग 'झाला आहे. त्या रोगांचा नयनाट करण्यास प्रतिबंधक लस सरकारने दिली पाहिजे.



# एन्काउंटर स्पेशालिस्ट दया नायक यांची पुन्हा पोलीस दलात एंट्री

आधुनिक केसरी

**मुंबईत अंडरवर्ल्डसोबत दोन हात करणारा 'रिअल हिरो' अशी ख्याती असलेल्या दया नायक हा पोलिस उपनिरिक्षक सुरूवातीला अनेक हलाखीची कामे करावी लागली मात्र त्याची जिद्द आणि आत्मविश्वासाने त्याला एक 'नायक' बनवले.मुंबईचा सुपर कॉप म्हणून दया नायक यांची ओळख आहे. त्यांचं नाव ऐकून किरकोळ गुन्हेगारचं नाही तर मोठ मोठे डॉनही घाबरतात. दया नायक यांच्या नावावर एक-दोन नव्हे तर ८५ हून अधिक एन्काउंटर केलेत. दाऊद इब्राहिम, छोटा राजन, छोटा शकील या सर्वांची झोप या सुपर कॉपने उडवली होती.**



इन्स्पेक्टर दया नायक यांनी मुंबईतून एकापाठोपाठ एक अंडरवर्ल्ड कारवायांचा खात्मा करून स्वतःचा ठसा उमटवला. दया नायक यांची कथा खूपच फिल्मी आहे. त्यांचा जन्म कर्नाटकातील उडुपी भागात झाला. दया लहान असतानाच त्यांच्या वडिलांनी दया यांच्या आईला सोडून दिलं. आईने मोठ्या कष्टाने तीन मुलांना वाढवलं. दया नायक अगदी लहान वयात कामाच्या शोधात मुंबईत आले. कधी फलाटावर तर कधी रस्त्यावर रात्र काढली. ते मुंबईच्या झोपडपट्टीत वाढले. घरची परिस्थिती अशी होती की दोन वेळची भाकरीही नीट मिळत नव्हती. या बिकट परिस्थितीनं त्यांच्यातील लढवय्या प्रवृत्तीला जन्म दिला.दया नायक मुंबईत एका हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करत होते. त्यांना थोडे पैसे मिळू लागल्यावर त्यांनी यासोबतच अभ्यासही करायला सुरुवात केली. दया नाईक यांनी दहावीची परीक्षाही पास केली, पण खाकी गणवेशात ते स्वतःला पाहत होते. आपल्या मेहनतीच्या आणि प्रयत्नांच्या जोरावर दया नाईकांनी १९९५ ला त्यांनी मुंबई पोलिसात सब इन्स्पेक्टरची नोकरी मिळवली. इथून सुरु झाला देशातील सर्वात प्रसिद्ध पोलीस अधिकारी होण्याचा प्रवास. देशातील टॉप टेन एन्काउंटर स्पेशालिस्टमध्ये दया नायक यांचं नंतरच्या काळात नांव समाविष्ट झालं सद्या दया नायक महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकात कार्यरत आहेत त्यांची नुकताच पोलीस दलात बदली झाल्याचे वृत्त वाचनात आले त्यामुळे अशा या जिगरबाज पोलीस निरीक्षकाची पुन्हा पोलीस दलात एंट्री झाल्याने अनेकांचा थरकाप उडणार आहे हे मात्र नक्की !!



दया नायक यांची 1995 मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून नियुक्ती झाली होती. प्रदीप शर्मा यांच्यासोबत त्यांनी गुन्हे अन्वेषण शाखेत काम सुरू केले. नायक हे शर्मा यांच्या एन्काउंटर पथकात होते. त्यांनी 1996 मध्ये पहिला एन्काउंटर केला. याशिवाय जवळपास 80 गुंडाचे एन्काउंटर केले आहेत. दया नायक यांची कारकिर्द वादग्रस्तदेखील ठरली. बेहिशेबी मालमत्ता आणि अंडरवर्ल्डसोबत संबंध असल्याच्या आरोपावरून त्यांना पोलीस सेवेतून 2006 साली निलंबित करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अॅन्टी करप्शन ब्युरोने त्यांना अटक केली होती. पुढे अॅन्टी करप्शन ब्युरोने कोणतेही पुरावे न दिल्याने नायक यांना या प्रकरणात क्लिन चीट मिळाली. 2012 मध्ये नायक पुन्हा सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांची नियुक्ती मुंबईत करण्यात आली. त्यानंतर त्यांची बदली नागपूर येथे करण्यात आली होती. मात्र नागपूरला रूजू न झाल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली. ही कारवाई 2016 मध्ये मागे घेत त्यांची मुंबईत पोस्टिंग करण्यात आली.

**राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# एकाच मंदिरावर नवीन ट्रस्ट स्थापण्याचे प्रयत्न हाणून पाडा

## श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे मंदिर महासंघास निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथील श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिरावर ट्रस्ट अस्तित्वात असताना नवीन ट्रस्ट स्थापन करण्याचे प्रयत्न हाणून पाडण्याची मागणी श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी महाराष्ट्र मंदिर महासंघाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघ राज्यातील मंदिरांच्या विविध समस्यांसाठी स्थापन करण्यात आलेला असून मंदिरांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी महासंघ कार्यतत्पर आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघास दिलेल्या या निवेदनात म्हटले आहे की, श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर, पहूर हे मंदिर देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर पहूर - पाचोरा मार्गावर पहूर पासून २ किलोमीटर अंतरावर वसलेले महादेवाचे पुरातन मंदिर आहे. हे मंदिर मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० ( सन १९५० चा मुंबई अधिनियम २९ ) अन्वये सहाय्यक धर्मादाय आयुक्त जळगाव विभाग जळगाव यांच्या कार्यालयात दि . २३ / ०१ / २००६ रोजी ई -१०८६ या क्रमांकाने नोंदणीकृत करण्यात आले आहे. सन १९९१ मध्ये या मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी मंदिराचे पुजारी शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी मंदिरात प्रथम दर्शनासाठी येणाऱ्या भाविकाच्या हस्ते केवळ एक फळ सेवन करून ४२ दिवसांचे अनुष्ठान करत लोकसभागातून मंदिराची उभारणी केलेली आहे. तसेच २००६ मध्ये क्षेत्र काशी विश्वनाथ येथून पदयात्रेद्वारे गंगाजल आणून २८ महिन्यांचा खडतर उपवास करून लोकसहभागातून भव्य शिव मंदिराची उभारणी केली आहे. आजपर्यंत गेल्या १८ वर्षां पासून महाशिवरात्रीनिमित्त भव्य अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह, शिव महापुराण कथा, भजन, गायन, जलाभिषेक, दुग्धाभिषेक असे विविध उपक्रम राबविले जात आहेत. मंदिराच्या समोर मोठा खुला भूखंड असून त्यावर श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिराच्या अधिपत्याखाली गोशाळा संशोधन केंद्र उभारण्यात आले होते. तसेच



हनुमान मंदिर उभारले असून नुकतेच या मैदानास छत्रपती शिवाजी महाराज मैदान असे नामकरण करण्यात येऊन पोलीस भरती आणि सैन्य भरती ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सदर मैदान निशु :ल्क रित्या खुले करून देण्यात आले आहे. या मैदानावर महाशिवरात्रीला बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदेतर्फे भव्य धर्म स्तंभ उभारण्यात येऊन ध्वजारोहण करण्यात आले आहे . मंदिराचे पुजारी व ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी विजयादशमीपासून मंदिर जीर्णोद्धार आणि परिसर विकासासाठी आजन्म भिक्षा झोळीचा संकल्प केलेला असून त्याद्वारे ते दररोज सकाळी सायकल द्वारे पंचक्रोशीत शंखनाद करत भिक्षा मागत आहेत. त्यांच्या संकल्पास पंचक्रोशीतील भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळत असून मंदिर विकासाचे कार्य अविरतपणे सुरू आहे.

असे असताना पहूर कसबे येथील रहिवासी माजी पंचायत समिती सभापती श्री बाबुराव केशव घोंगडे यांनी एकाच मंदिरावर ॐ श्री संगमेश्वर महादेव व गुपीत महादेव मंदिर, पहूर असा नावात फेरबदल करून धर्मदाय आयुक्त कार्यालय जळगाव येथे नवीन ट्रस्ट मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केलेला आहे. या प्रस्तावावर श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टने रीतसर हरकत नोंदवली असून सदर प्रस्ताव रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टने कोणतीही समिती स्थापन केलेली नसताना श्री अजय रामकृष्ण देशमुख यांनी अनधिकृत रित्या आरती समिती स्थापन करून त्याद्वारे मंदिर परिसरात कार्यक्रमाचे आयोजन करणे, पावती छापून देणगी गोळा करणे, विकास कामाच्या नावाखाली मंदिर परिसरात अनधिकृत रित्या वास्तूंची तोडफोड करणे, नवीन बांधकाम करणे, अतिक्रमण करणे, मंदिर व्यवस्थापनावर राजकीय हस्तक्षेप वाढविणे, नद्यांचा नैसर्गिक प्रवाह आणि संगम बदलविणे या सारखे प्रकार केले जात असून मंदिर व्यवस्थापनास मानसिक त्रास दिला जात आहे. सोशल मीडियाचा गैरवापर करून सनातन धर्माच्या गौरवशाली परंपरेचा, मंदिरांचा आणि मंदिर रक्षणार्थ आणि सेवार्थ निरपेक्ष भावनेने कार्य करणाऱ्या पुजाऱ्यांचा जाहीर अवमान करणे यासारखे प्रकार उघडकीस आले आहेत तरी आपण याप्रकरणी सहृदयपूर्वक विचार करून संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करावी ही नम्र विनंती.

# दुधना पात्रात महसूल पथक दिसताच वाळूची चोरटी वाहतूक करणारे फरार

## बारा वाळू ट्रॅक्टर मालकांवर अंबड पोलिसांत गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**रामदास पटेकर**

**अंबड :** अंबड तालुक्यातील चांभारवाडी येथील दुधना नदीच्या पात्रातून अवैधरित्या 12 ट्रॅक्टरमधून वाळू भरून चोरटी वाहतूक करणाऱ्या 12 ट्रॅक्टर मालकांवर अंबडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली दि.26 रोजी अंबड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या पथकात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह मंडळ अधिकारी भागेश भार्डीकर तसेच तलाठी संतोष जैस्वाल, सुनील सोरमारे, गणेश मिसाळ, स्वप्नील खरात, राहुल चव्हाण, रमेश कांबळे यांचा समावेश होता. अंबड तालुक्यातील चांभारवाडी येथील दुधना नदीच्या पात्रात अवैधरित्या वाळू तस्करांकडून ट्रॅक्टरद्वारे वाळू भरण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाल्याने दि. 21 मार्च रोजी सकाळी 9 वाजण्याच्या सुमारास त्यांनी आपल्या वाळू पथक,अधिकारी तसेच तहसीलचे कर्मचारी व 2 पंच सोबत घेऊन चांभारवाडी येथील दुधना नदीच्या पात्रात अवैधरित्या 12 ट्रॅक्टर मध्ये वाळू भरत असल्याचे दिसून आले. पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना पाहताच वाळूने भरलेले घेऊन पळून गेले. मात्र त्याच वेळी नदीच्या बाजूला असलेल्या शेतातील शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व मालकांबाबत चौकशी केली असता चोरटी वाहतूक करणाऱ्या आरोपींची माहिती पथकाला मिळाली. गुन्हा दाखल करण्यात आलेल्या ट्रॅक्टर मालकांची नावे पंडित मदनुरे, देविदास जिगे दोन्ही रा.मठपिंपळगाव, कमलाकर मुळे, अशोक शेळके दोन्ही रा. हरतखेडा, अमजत पठाण, मुस्ताफ पठाण दोन्ही रा. नागझरी, गजानन पवार, गणेश शेळके दोन्ही रा. आलमगाव, बाळू देठे, विकास देठे दोन्ही रा.साडेसावंगी, कृष्णा कापसे, संभाजी भागवत दोन्ही रा. लोणार भायगाव ता. अंबड असे आहे. या आरोपींनी आपल्या ट्रॅक्टरमध्ये वाळू भरून चोरट्या मार्गाने चोरटी वाहतूक करून घेऊन पळून गेल्याने नदीपात्रात काहीच मीळून आले नाही. पंचासमक्ष पंचनामा करून मठ पिंपळगावचे तलाठी मोहित दत्तात्रय गोषिक यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल पी.आर. चव्हाण हे करत आहेत.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अंबड तहसीलदार पदाचा पदभार स्विकारताच दि .8 मार्च रोजी गोंदी येथील सिद्धेश्वर व पाथरवाला ( बु ) येथून 100 ब्रास वाळुसाठा जप्त केला . तसेच 11 मार्च रोजी पुन्हा गोंदी येथील सिद्धेश्वर पॉईंट वर 20 ब्रास वाळू जप्तीची कार्यवाही तसेच भोकरवाडी टोलनाका येथे दि .25 रोजी एम .एच .23 डब्ल्यू 8822 शेख लतीफ मोहम्मद यांच्यावर कार्यवाही करण्यात आली .

अंबड तालुक्यात कोठेही अवैध वाळू वाहतूक होत असेल तर त्या वाळू वाहतूक करणाऱ्या व्यक्तीचे अथवा ड्रायव्हरचे नाव तसेच ट्रॅक्टर व हायवाचा क्रमांक द्यावा . त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल . अवैध वाळू वाहतूक आपल्या तालुक्यात पूर्णपणे बंद करण्यास नागरिकांनी मदत करावी .

**चंद्रकांत शेळके, तहसीलदार अंबड**



# मॉडेल कॉलेज येथे आज कार्यशाळेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे घटक महाविद्यालय मॉडेल कॉलेज घनसावंगी येथे दिनांक 29 मार्च रोजी चॅलेंजेस अँड प्रोस्पेक्ट्स ऑफ यूजीसी सैंक्शन मॉडेल कॉलेजेस या विषयावरती एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख अतिथी म्हणून सहकार व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री महाराष्ट्र राज्य माननीय अतुल सावे, आमदार माजी कुटुंब कल्याण आरोग्य मंत्री मा. राजेश टोपे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे कुलगुरू, प्रो. डॉ. प्रमोद येवले, प्र. कुलगुरू प्रो.डॉ. श्याम शिरसाठ, उच्च व तंत्र शिक्षण सचिव श्री विकास चंद्र रस्तोगी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, कुलसचिव डॉ. भगवान साखले, प्राचार्य डॉ मिलिंद पंडित ,डॉ अंशुमन मगर, डॉ संदीप सांगळे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत महाराष्ट्रातील सात मॉडेल कॉलेज,हिंगोली, बुलढाणा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, आंबढवे,तलेरे येथील प्राचार्य, प्राध्यापक तसेच संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. तीन सत्रा मध्ये विविध तज्ञांच्या उपस्थितीमध्ये ही कार्यशाळा संपन्न होत आहे.जास्तीत जास्त संशोधक विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी सहभागी होण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. भगवान साखले कार्यशाळा संयोजक प्राचार्य डॉ सतीश दांडगे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर खोजे, डॉ. संतोष गायकवाड यांनी केली आहे.




महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

EPFO
EPS-1995 Option Form
Before 01.09.2014
After 01.09.2014
ऑनलाईन फॉर्म आमच्याकडे भरुन मिळेल
कागदपत्र-पी.पी.ओ.नंबर, यु.ए.एन.नंबर, आधार कार्ड ( मोबाईल लिंक असणे गरजे ), ई-मेल आय., बँक पासबुक.
AADHAAR
आधार सेवा केंद्र
• जन्म तारिख • नावात बदल
• मोबाईल नंबर • पत्यात बदल
• मेल आय.डी. • लग्नानंतरचे नाव
आधार काढून १०वर्ष झाली असेल तर अपडेट करुन मिळेल.
अधिक माहितीसाठी संपर्क संचालक-दत्ता जाधव
महा ई-सेवा केंद्र
आपले सरकार सेवा केंद्र
मो.9403345739

CAFE ROCKSTARZ
EAT . CHILL . REPEAT
11:11 ELEVEN ELEVEN
Where Dishes come True..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928

# लोककल्याणकारी राजा : सम्राट अशोक



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतामध्ये अनेक राजे महाराजे होऊन गेले. प्रत्येक राजेमहाराजे यांचा इतिहासही आहे. परंतु सम्राट अशोक यांचा फक्त इतिहासच नाही तर हजारो वर्षे होऊनही लोकांच्या मनात आदर आहे. लहान मोठे अनेक राजे महाराजे होऊन गेले परंतु सम्राट मात्र एकच ते म्हणजे सम्राट अशोक होत. सम्राट अशोक हे कुशाग्र बुद्धीमत्ता असलेले एक शुर व पराक्रमी सम्राट होते. अशोक यांना सम्राट का म्हणतात याचेही कारण आहे ते म्हणजे देशात अनेक तुकड्यात अनेक प्रांत राज्य विभागले गेले होते. राजे आपापल्या विभागल्या गेलेल्या प्रांतापुरतेच मर्यादित होते. परंतु सम्राट अशोकाने भारतातील सर्व प्रांत व विभाग यांना जोडून अखंड भारताची निर्मिती केली. अखंड भारतावर राज्य करणारा एकमेव राजा म्हणजे सम्राट अशोक होत.**

त्यावेळी भारत आज आहे एवढा नव्हता जंबुद्विप अर्थात आजचा भारत हा खुप व्यापक होता त्यामध्ये भारत,पाकिस्तान, नेपाळ, अफगाणिस्तान, म्यानमार तिबेट आणि चिन अशा विस्तीर्ण पसरलेला होता. आणि या जंबुद्विप ला एकत्रीत करून त्यावर राज्यच केले नाही तर मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवून लोककल्याण करून जनतेला सुखी ठेवण्यासाठी त्यांनी राज्य कारभार केला. अशोक सम्राट हे शुर, पराक्रमी तर होतेच परंतु ते एक कुशल व तिक्ष्ण शिकारी सुद्धां होते. अत्यंत सफाईदार पणे व सहज पणे ते शिकार सुद्धां करत असत म्हणजे ते उत्कृष्ट नेमबाज होते. एवढे सर्व असताना ही मात्र जनतेला कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही याची खबरदारी घेत होत. सम्राट अशोक हे विज्ञाननिष्ठ, पाखंड व अंधश्रद्धा विरोधी असल्याने त्यांनी राज्यात होमहवम व होमहवनाच्या माध्यमातून होणारी पशुहत्या थांबवण्याचे कायदेच करून दिले. राज्यामध्ये माणसाबरोबर प्राण्यांनाही जिवाचे संरक्षण मिळवून देणारे सम्राट अशोक हे जागतिक राजे होत. सम्राट अशोक यांच्या बरोबरीचा मग तो बुद्धी, जनकल्याण, पराक्रम,शुर व साम्राज्य विस्तार असणारा सर्वश्रेष्ठ राजा होत. एवढा पराक्रमी, शुर, शोर्यवान सम्राट असुनही मात्र कलिंग युद्धांनंतर बुद्ध धम्माचे प्रचारक बनतात ही ऐतिहासिक बाब आहे. मुळात राजा म्हणले तर युद्ध आले, युद्ध आले म्हणजे जिवन मरण आलेच. त्यातही शुर, पराक्रमी राजा म्हणजे कित्येक लोकांना मारुन त्यांचे मृतदेह बघितले असतील तरीही कलिंग युद्धानंतर बुद्धाला शरण येऊन धम्माचाच प्रचार आणि प्रसार का केला असेल? याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे. राज्यकारभार व राज्य टीकवण्यासाठी लढाई, युद्ध करावेच लागते, तह करावेच लागत होते कारण तो त्या वेळी राजनितीचा भाग होता. परंतु कलिंग युद्ध झाले आणि कलिंग युद्धाने खुप हिंसक वळण घेतले होते. साधारण युद्धामध्ये सैन्य मरत असते परंतु कलिंग युद्धांमध्ये सैन्यतर गेलेच परंतु महिला, वृद्ध आणि बालकांना सुद्धां मारण्यात आले. सदर घटना युद्धाची नसुन हिंसेची होती. लाखाच्या वर मृतदेह मरून पडले. कलिंग मध्ये सम्राट अशोकाचा विजयही झाला परंतु ही लढाई अशोक सम्राट यांच्या जिवनातील शेवटची लढाई ठरली. महिला, वृद्ध व मुल यांचा काहीच दोष नसतात ते नाहक मारले गेले याची चिंता लोककल्याची जाणीव असलेल्या सम्राट अशोक यांना झाली. सम्राट अशोक यांनी तेव्हा तलवार खाली ठेवली आणि तथागत गौतम बुद्धाचे विचार मानवाला कसे तारू शकतात, लोककल्याण कसे साद्य केले जाऊ शकते यासाठी त्यांनी धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचा निर्णय घेतला. जंबुद्विप वर राज्य करणारा आणि लोककल्याण कारी असलेला राजा धम्म स्विकारतो आणि धम्माचे विचार सांगतो म्हणून जंबोद्वीप मधिल बहुसंख्य जनता सम्राट अशोक यांच्या प्रभावाखाली आली. व बघता बघता तथागत बुद्धाचा धम्म भारतातच नाही तर भारताबाहेर पसरायला सुरवात झाली.

अशोक सम्राट यांनी धम्माचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी व प्रचार करणाऱ्या भिक्खू संघाला मदत होण्यासाठी धम्माच्या नावाने विश्वासातील लोकांना एकत्र घेऊन एक विभागच बनलला आणि या विभागामार्फत धम्माच्या प्रसार व प्रचार आणि मदत अशी कामे केली जाऊ लागली. तथागत गौतम बुद्धांनतर धम्माचा सर्वात मोठा प्रचारक ते म्हणजे सम्राट अशोक होत. सम्राट अशोक यांनी अखंड भारतातच नव्हे तर भारताबाहेर सुद्धां धम्माचा प्रचार आणि प्रसार केला आणि लोककल्याणकारी विचाराची पेरणी जगाच्या मातीत केली. अंधश्रद्धा, पाखंड विरहित धम्माचे विचार जगाच्या पाठीवर नेऊन बुद्ध धम्माला जागतिक स्तरावर प्रस्थापित करणारे सम्राट अशोक हे अखंड भारताचे सम्राट होत. अखंड भारताचे सम्राट हा शब्द वारंवार उच्चारण्यामागे खुप मोठे कारण आहे. आम्ही फक्त जयंती वा स्मृतीदिन साजरे करायचे म्हणून करत नाही. इतिहासाने शिकवलेली शिकवण याचा वर्तमानात काय फायदा होतो, आणि ईतिहासामध्ये असलेले लोककल्याणकारी विचार व नेतृत्व आज समाजामध्ये आहे का याचा तुलनात्मक व चिकित्सक अभ्यास करून आदर्श जिवनपद्धती कोणती व आम्हाला आदर्श जिवन पद्धती कशी टिकवता येईल याची समिक्षा करत असतो. म्हणून अखंड भारताचे सम्राट हे उच्चारण्याचे सर्वात मोठे कारण हे आहे की सम्राट अशोक यांचे जेवढे राज्य विस्तीर्ण होते तेवढे कोणाचेही नव्हते. सम्राट अशोक लोककल्याणकारी होते. एक विचारधारा, एक तत्व, एकच आदर्श, हे सर्व करण्यासाठी अनेक विद्वान लोकांची टीम. म्हणजे सम्राट अशोक यांचे



जेथे राज्य होते तेथे तेथे बुद्धांचे विचार व आचार होते. म्हणजे बुद्ध संस्कृती होती. म्हणजेच अखंड भारत, जंबोद्वीप बौद्धमय होता. म्हणजे बुद्धांच्या विचारावर चालणारे राष्ट्र होते. सम्राट अशोका नंतर वा अगोदरही अखंड भारतावर राज्य करणारा एकही राजा निर्माण झाला नाही. सम्राट अशोकाने फक्त बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसारच केला नाही तर बुद्धाचे विचार व त्यांची व्याप्ती किती आहे हे सांगणारे व धम्माची शिकवण देणारे 84000 हजार स्तुप बांधले, अनेक स्तंभ बांधले, शिलालेख व गुहा लेख बांधून हजारो वर्षापर्यंत बुद्ध व त्यांचे विचार लोकांच्या मनामध्ये कसे राहतील याची सोय केली. लोकांच्या दुःखमुक्तीचा एकच मार्ग म्हणजे तथागत गौतम बुद्ध व त्यांचे विचार. सम्राट अशोकाच्या माध्यमातून बुद्ध धम्माला राजाश्रय मिळाला व तळागाळापर्यंत बुद्धांचे विचार रुजवायला सुरुवात झाली होती. सम्राट अशोक यांचा जनतेवर एवढा प्रभाव होता की राज्यातील जनता चोरी, व्याभिचार, मद्यपान करणे देखील टाळत होते. बुद्धांचा धम्म एवढा जनमाणसात रुजला होता. सम्राट अशोक यांनी मुलगी संघमित्रा व मुलगा महिंद्र यांना धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी विदेशात पाठवले. म्हणून बुद्धांचे जनकल्याणाचे विचार जगाने स्विकारले व जग बौद्धमय होताना दिसत आहे. भारतात व भारताबाहेर बुद्ध धम्म रुजवण्याचे काम सम्राट अशोक यांनी केले. २९ मार्च हि अशोक सम्राट यांचा जंयती दिन. या दिवशी सम्राट अशोक यांना अभिवादन करणे हि सामाजिक इमानदारी आहेच परंतु सम्राट अशोक यांनी निर्माण करून दिलेला बुद्ध धम्माचा वारसा व तो उजेडात आणणे ही जबाबदारी आहे. मग विदेशात अजून बुद्ध विहारे, स्तुप, शिलालेख आहेत. काही ठिकाणी नैसर्गिक आपत्ती मुळे जमीनीखाली गेलेही असतील परंतु विदेशात जेव्हा जेव्हा उत्खनन होते तेव्हा बुद्ध वास्तु सापडल्याच्या बातम्या येतात. परंतु भारतात बांधलेल्या 84000 हजार स्तुप गेले कुठे? कोणी अतिक्रमण केले? कोणी द्वेष भावनेतून पाडले? वेरुळ अजिंठा सारख्या जगविख्यात लेणी, अशोक चक्र व अशोक स्तंभ राष्ट्रीय प्रतिक असताना सुद्धा हा देश बुद्ध राष्ट्र होते आणि आहे असे का म्हणत नाहीत. उत्खननात सापडलेल्या वास्तुचा संबध थेट देवांशी जोडून बुद्ध का लपवले जातात? आजही अनेक लेण्यांचे, बुद्ध स्तुपांचे दैविकरण करून बुद्धाला काल्पनिक देव समजून पुजा केली जाते. प्रबोधनकार ठाकरे यांच्या मतानुसार आजचे मंदिर पुर्वीचे बौद्ध विहारच होते. बुद्ध काढून तेथे देव प्रस्थापित केला. सम्राट अशोक यांची जयंती साजरी करताना सम्राट अशोक यांचे विचार व कार्य यांचा प्रचार आणि प्रसार करणे क्रमप्राप्त ठरतेच परंतु त्यांनी निर्माण केलेला वारसा आज जास्त महत्त्वाचा आहे. सम्राट अशोक लोककल्याणकारी होते. ते मानवतावादी विचाराचे होते. व धम्माचे अनुयायी होते. प्रामाणिक होते. परंतु सध्या सत्तेत असलेले लोक बुद्धाला ध माणणारे आहेत, प्रामाणिक व लोककल्याणकारी असल्याचा तर प्रश्न च नाही. सम्राट अशोकामुळे बुद्ध जनमानसात पोहचले.

पुढे बौद्ध स्तुपाची नासधूस पुष्यमित्र शुंग यांनी केली. आजही कुटील विचारसरणीचे पुष्यमित्र शुंग आहेत. जे बुद्ध वास्तुचे दैवतीकरण करून देव बनवून पुजा करण्याचा प्रयत्न करत आहेत. व बुद्ध वास्तु, शिल्प यांचा वापर अंधश्रद्धा पसरवण्यासाठी करत आहेत. सम्राट अशोक यांनी निर्माण केलेला इतिहास हा गुफा, स्तुप व शिलालेख यावर अजूनही जिंवत आहे म्हणुन असे स्तुपांची एकतर नासधूस केली गेली आहे असलेल्या स्तुपाचे दैविकरण. बुद्धाचे विचार व सम्राट अशोकांचे कार्य जतन करायचे असेल तर आज आपण जयंती निमित्ताने सर्वांनी एकत्र येऊन. बुद्ध विचार, वारसा जपण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आणि 84000 हजार स्तुप, लेण्या, शिलालेख, राष्ट्रीय प्रतिक म्हणून अशोक चक्र आणि अशोक स्तंभ यांचा स्विकार देशाने केलेला आहे याचाच अर्थ देश हा बौद्ध राष्ट्रच आहे. यावर ठाम राहुन आणि इतिहासाला उजाळा देऊन आपल्याला वैचारिक जयंती साजरी तर करायचीच आहे शिवाय सम्राट अशोक यांनी निर्माण केलेले स्तुत्य, वास्तु शिल्प यांचा शोध घेऊन ते जतन कयायचे आहे. धम्माचे प्रतिके जतन करण्यासाठी आपण एकत्र येउन लढलो, एकिकरण केले तरच सम्राट अशोक यांची जयंती साजरी केल्याचे सार्थक व बुद्दाचा देश असल्याचे समाधान मिळेल.

# असंतुष्टांचा मेळ...झाला... निष्ठेचा खेळ



कॉ. के. के. जामकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**गड्यांनो आजच्या लेखात लै भारी भारी शब्द वापरलेत. हे शीर्षक जुळविण्यासाठी लै डोकं खर्च करावं लागलं. अखेर शीर्षकावर तर लेखाची मजा असते. तुम्हाला सर्वांना माहीत आहे, कॉम्रेड जांबकर ला परिस्थितीचे वास्तव सापडल्याशिवाय त्याची प्रखरतेने मांडणी केल्याशिवाय चैन पडत नाही. असू द्या ना राव, पुढं सरकतोस की न्हाई, का उगाच आमच्या बुद्ध्या टांगणीला लावतूस ? नाय बाबा नाय तुम्हीच तर वाचक माझे खरे दैवत आहात म्हणूनच तुमच्या माझ्यावरील मायेच्या थापेमुळेतर मी इथपर्यंत येऊन एखादे पुस्तक प्रकाशित करू शकलो, नाय तर शाळीग्रामसारखाच न्हायलो असतो.. बरं बरं चला, लौकर लौकर पूडं जाऊया. पुढ निउन ठिकाणाला पोहोंचविण्यापूर्वी सुरू करूयात आजच्या लेख शीर्षकाचा बाजार.**

"असंतुष्ट", "मेळ", "निष्ठा", झाला त्याचा "खेळ" शब्द फार सोपे सोपे आहेत त्यामुळे त्याच्या स्पष्टीकरणात मी जात नाही कारण माझे वाचक हे समाजण्याऐवढे बुद्धिवादि आहेत. हा लेख प्रपंच करमणुकीचा भाग नसून वर्तमान राजकारणातील नाटकी "डुप्लिकेट" समाज नेतृत्व करून आम्हीच कसे खरे जनतेचे इमानदार सेवक आहोत आणि आमच्या शिवाय तुमची कुणीच प्रामाणिक सेवा करू शकत नाहीत हा दाखविण्याचा भोळा भाभडा (बालिश) प्रयत्न म्हणावा लागेल. यालाच म्हणतात "सौ चुहे खाके बिल्ली हज चली". मला कुणाला नावं ठेवायचा अधिकार नाही पण व्यक्तिपरत्वे ज्याचा त्याचा स्वभाव गुणधर्म आपल्या समोर ठेवण्याचा हक्क माझ्या "बाबानी" जरूर मला दिलाय. आम्ही महाराष्ट्रीयन छत्रपती शिवाजी, संभाजी, शाहू फुले आंबेडकर यांच्यासह थोर देशभक्त व संत महात्म्यांचे वंशज, मग मला एक सांगा आम्ही जे जनतेचे सेवक म्हणून वर्षानुवर्षे राजकारण करून सेवेचा डांगोरा पिटतो तेंव्हा जिथे कुठे सेवक म्हणून काम करतो त्या प्रति प्रामाणिकपणे निष्ठा ठेऊन जनतेची सेवा करावी की दहा पिढ्या बसून खातील एवढे कमावूनही आहे तिथली निष्ठा सोडून सेवेच्या नावाखाली उठ-सूट कोलांट उड्या मारून स्वतःचा हेतू साध्य झाला नाही म्हणून नेहेमीच पक्ष बदलत राहून राजकारणच करत राहायचे याला सेवा म्हणावी काय? जेथे प्रामाणिकपणे जनसेवेप्रति निष्ठा कायम असते ती माणसे समाजकारण करूनही जनतेची सेवा करू शकतात पण आम्हाला नौटंकी दाखवायची आहे. खुर्चीशीवाय आम्हाला जनतेची सेवाच करता येत नाही. समाजकारणाच्या नावाखाली राजकारण करून आधी सत्ता सुंदरी जवळ करायची आन हळूहळू सामान्य जनतेच्या तोंडाला पाने पुसून "भत्ते" हस्तगत करायचे आणि नंतर वरेमाप मालमत्ता जमा करायची हेच प्रमुख राजकीय समीकरण झाले आहे. पण साहेब जनता आता पूर्वीसारखी राहिली नाही. तुम्ही किती आणि कसेकसे सत्तेच्या समिकरणातून जनसामान्यांच्या डोळ्यात धूळ फेकून "भत्ते" जमविता व गोरगरिबांच्या पोटावर कसा कत्ता मारता हे समदे जाणून हाईत. येड्याचं सोंग घेऊन पेडगावला जाऊन समाजकल्याणाच्या नावाखाली राजकारण करून आपले इमल्यावर इमले पाच वर्षात कसे उभे राहतात याचे आम्हालाही भान आहे. तुमच्या ऐवढे शहाणे आम्ही जरूर नाहीत पण या छत्रपतींच्या राज्यातील प्रत्येक नागरिक "बहिर्जी नाईक" म्हणून जरूर आहोत.

दिनांक २६/०३/२०२३ रोजी नांदेड जिल्ह्यातील लोहा येथे आपल्या शेजारी तेलंगाणा राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री के सी आर यांनी आपल्या बी आर एस पक्षाचे पाय रुजविण्यासाठी भव्य पक्षप्रवेश सोहळा घेऊन ते राबवित असलेल्या लोक कल्याणकारी योजना महाराष्ट्र सरकारनेही आपल्या राज्यात राबवून शेतकऱ्यांसह सर्वसामन्याला सुखी करावे म्हणून त्यांच्या बी आर एस पक्षमार्फत महाराष्ट्रातील जनतेलाही सोई सुविधा मिळाव्यात म्हणून पक्ष प्रवेश सोहळा ठेवल्याचे विविध माध्यमातून समजले. बी आर एस पक्षाची पाळेमुळे महाराष्ट्रात रुजावीत म्हणून आपल्या राज्यातील काही असंतुष्ट आत्मे त्यांच्या गळाला लागले. मी अशा गळाला लागलेल्या माशाबद्दल असंतुष्ट हा शब्द मुद्दामच वापरला आहे. वर्तमान राजकारणात सत्ता-भत्ता व मालमता हव्यासापोटी कोलांट उड्या मारून सत्ता हस्तगत करणारी मंडळी तमाम राजकारणात काही कमी उरली नाही. अशा माशांनी महाराष्ट्रातील राजकारणात सत्ता व खुर्चीसाठी आपल्या तत्वांप्रति असलेल्या निष्ठा खुंटीला टांगून वेगवेगळ्या राजकीय पक्षात स्वार्थासाठी प्रवेश करून जनतेची कशी सेवा केली याचा लेखाजोखा सर्वसमन्याला ज्ञात आहे. जनतेला यांच्या कोलांटउड्यांमुळे आत्तापर्यंत यांनी काय मिळवून दिले, भविष्यात अशा चंचल निष्ठावनांकडून सर्वसमन्याला नक्कीच काय मिळणार आहे याचा सर्व स्तरातील भोळ्या भाबड्या महाराष्ट्रीयन जनतेने सय्यमाने विचार करणे गरजेचे वाटते. अमाप मॅनेज्ड गर्दी जमवून आपला पब्लिसिटी स्टंट बनवून सर्वसमन्याला उल्लू बनविणे हा यांचा कायम व्यवसाय झालेला आहे. याचे भान आपण सर्वांनी ठेवणे गरजेचे वाटते, अन्यथा यांच्यासाठी सत्ता-भत्ता- मालमत्ता व आपल्यासाठी कत्ता असे होता कामानये. म्हणून अशा कुठल्याही असंतुष्टांच्या भूलथापांना आपण बळी पडू नये. जी माणसे आपल्या विचारतत्वांशी प्रामाणिक आणि एकनिष्ठ रहात नाहीत, सारखे सारखे तळ्यात मळ्यात करतात, यांचेच वर्तमान व भविष्य यांनाच उमजत नसते, मग अशांकडून आपल्या वर्तमान व भविष्याची भीक मागण्याची वेळ आपल्यावर येऊ नये. वर्तमानात बी आर एस अजून बाल्यावस्थेत आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्यांच्या हिताची प्रामाणिक नाडी ओळखून त्यावर औषधोपचार करण्यासाठी त्यांना तरुणाईत येऊन आवश्य तेवढे matured व्हावे लागेल. त्यासाठी असंतुष्टला जवळ धरून निष्ठेची खेळी खेळणाऱ्याला नव्हे. या नूतन पक्ष प्रवेश सोहळ्या निमित्ताने मला बालपणीच्या " चल रे भोपळ्या टूणुक टुणूक..." ही कविता आठवली व या कवितेतील ओळीनुसार शेवटी म्हातारीने भोपळाच कसा पळवून नेऊन आपला कार्यभाग साधला तशी अवस्था न हो.

म्हणून वाटते हा वेळोवेळी सत्ता-भत्ता-मालमत्ता साठीचा असंतुष्टांचा मेळावा ठरू नये. वर्तमानातील जनता हुशार असल्यामुळे अशा निष्ठवंतांना चांगले ओळखते पण प्रलोभणापाई मतदानाची टक्केवारी वाढवून भविष्यात काय होईल हे सांगणे कठीणच. **आपल्या महाराष्ट्राच्या राजकारणातील मेंढरं लै भारी हिरवं कुरण दिसलं की जातात कुणाचाय दारी.**

**जयहिंद। लाल सलाम। इन्कलाब जिंदाबाद।**



# सार्वजनिक हित सेवा-सुविधांना प्राधान्य!




श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**शासनाचे व्यवस्थापन आणि सार्वजनिक धोरणांची कार्यवाही यांसाठी कुशल, प्रशिक्षित आणि सेवाशाश्वती असलेले सवेतन अधिकारीतंत्र आणि त्याची श्रेणिबद्ध यंत्रणा असते. या प्रशासकीय यंत्रणेचे स्वरूप, तिची रचना, त्यामागील तत्त्वे यांच्या शास्त्रीय अभ्यासाला लोकप्रशासन म्हणतात. शासनव्यवस्थेत कायदेकानूनच्या विधियुक्त चौकटीत सार्वजनिक शासकीय नोकर कार्यरत असतात. म्हणून व्यापक अर्थाने सर्व शासकीय व्यवहारांना लोकप्रशासन म्हणता येईल. म्हणजेच विशिष्ट कृती करणारी यंत्रणा आणि त्या यंत्रणेचा अभ्यास, या दोन्ही अर्थांनी लोकप्रशासन ही संज्ञा वापरली जाते. विसाव्या शतकात एक महत्त्वपूर्ण अभ्यासविषय म्हणून लोकप्रशासन मान्यता पावले आहे.**

सुनियोजित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी योग्य मार्ग निवडून सामूहिक प्रयत्न करणे, या प्रक्रियेस प्रशासन म्हणतात. सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहकार्यावर आधारित असे प्रयत्न हे कोणत्याही प्रशासनाचे व्यापक वैशिष्ट्य असते. उद्दिष्टांशी सुसंगत अशा साधनांची निवड, उद्दिष्टपूर्तीच्या कार्यक्रमाचे नियोजन, उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य उपयोग, कामाचे वाटप आदी बाबींचा प्रशासकीय प्रक्रियेत समावेश होतो. या अर्थाने प्रशासन म्हणजेच उच्च प्रतीची तर्कशुद्धता असलेल्या सहकारी स्वरूपाच्या मानवी कृती होत. येथे तर्कशुद्धता म्हणजे उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने सर्वाधिक परिणामकारक अशा कृतींची निवड, असा अर्थ अभिप्रेत आहे. लोकप्रशासन हा प्रशासनाचा एक स्वतंत्र प्रकार आहे. वर सांगितलेल्या अर्थाने लोकप्रशासनातही सहकारी कृती आणि तर्कशुद्धता यांचा समावेश होतोच, पण त्याच्या सार्वजनिक- लोकाभिमुख स्वरूपामुळे लोकप्रशासन इतर प्रशासनांहून वेगळे आहे. सार्वजनिक हिताचा संदर्भ हे लोकप्रशासनाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. खाजगी किंवा व्यवसाय प्रशासन आणि लोकप्रशासन यांतील मुख्य फरक त्यांच्या उद्दिष्टांमध्येच असतो. खाजगी प्रशासनापुढे फायदा आणि कार्यक्षमता ही प्रमुख उद्दिष्टे असतात. लोकप्रशासनात नफ्यापेक्षा सार्वजनिक हित, सेवा-सुविधा यांना प्राधान्य असते. सार्वजनिक धोरणांची परिपूर्ती हे उद्दिष्ट असलेल्या सर्व प्रक्रियांचा लोकप्रशासनात अंतर्भाव होतो. ढोबळमानाने शासनाच्या कार्यकारी यंत्रणेचा लोकप्रशासनात समावेश केला जातो, परंतु त्याबरोबरच सार्वजनिक उद्योग, महामंडळे, आयोग इ.निमशासकीय स्वरूपातही लोकप्रशासन अस्तित्वात असू शकते. आधुनिक काळात शासनाच्या कार्यक्षेत्रात सतत वाढ होत असल्यामुळे लोकप्रशासनाच्या कार्याची व्याप्तीही वाढत असल्याचे दिसते. कार्यांमधील संख्यात्मक वाढीबरोबरच शासकीय कार्यांमधील गुंतागुंतही वाढली आहे. त्यामुळे सर्वच बाबतींत शासनाला तज्ज्ञांच्या सल्लामसलतीची गरज वाटू लागली. लोकप्रशासन हे धोरणे ठरविण्याच्या आणि न्यायदानाच्या क्षेत्रांतही महत्त्वाची भूमिका बजावते. या अर्थाने लोकप्रशासन हे शासनाच्या तिन्ही अंगांशी संलग्न असते. समाज जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये कमीअधिक प्रमाणात सार्वजनिक हितरक्षणासाठी लोकप्रशासन कृतिशील असते. भारतात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लोकप्रशासन हा स्वतंत्र अभ्यासविषय नव्हता. शासनसंस्था आणि राजकीय तत्त्वज्ञान यांचा अभ्यास राज्यशास्त्रात समाविष्ट केला जाई. अमेरिकेत आणि अन्य प्रगत देशांत लोकप्रशासन उदयाला आल्यानंतर भारतातही हळूहळू त्याचा अभ्यास होऊ लागला. सन १९३० नंतर लखनऊ विद्यापीठाने सर्वप्रथम लोकप्रशासनाचा राज्यशास्त्राच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील एक विषय म्हणून त्याचा समावेश केला. पुढे सन १९३७ साली मद्रास विद्यापीठाने लोकप्रशासनाचा स्वतंत्र पदविका अभ्यासक्रम सुरू केला. सन१९४९ मध्ये लोकप्रशासनाचा स्वतंत्र विभाग सुरू करणारे नागपूर हे पहिले विद्यापीठ होय. स्वातंत्र्योत्तर काळात बऱ्याच विद्यापीठांनी विभागांतर्गत लोकप्रशासनाचे स्वतंत्र पदव्युत्तर, पदविका अभ्यासक्रम सुरू केले. दि.२९ मार्च १९५४ रोजी भारतीय लोकप्रशासन संस्था- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन- आयआयपीएची स्थापना झाली. सन



१९६० नंतर पंजाब, उस्मानिया वगैरे विद्यापीठांनी लोकप्रशासनाचे स्वतंत्र विभाग सुरू केले. तथापि बहुसंख्य विद्यापीठांतील लोकप्रशासन हा विषय राज्यशास्त्र विभागात शिकविला जातो. राज्यशास्त्राच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यांसात लोकप्रशासनाचे अभ्यासक्रम समाविष्ट केलेले असतात, परंतु हळूहळू लोकप्रशासनाचे स्वतंत्र विभाग स्थापन करण्याकडे कल दिसतो. राज्यशास्त्र विभागातही लोकप्रशासनाचे अध्यापन स्वतंत्र अध्यापकांकडे सोपविलेले असते. अहमदाबाद येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, हैदराबाद येथील इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिनक एंटरप्रायझीस, महाराष्ट्र शासनाची विकासलक्षी प्रशासनाचा अभ्यास करणारी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन- मिडा, मुंबई येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, प्रशासकांना प्रशिक्षण देणाऱ्या मसुरी, हैदराबाद येथील संस्था आदी. शासकीय, निमशासकीय संस्थांमुळे लोकप्रशासनाच्या संशोधनास पाठबळ मिळते. भारतात लोकप्रशासनाच्या अभ्यासातच स्थानिक शासनयंत्रणा आहेत. त्यात लोकशाही विकेंद्रीकरण, सहकारी चळवळ इ.घटकांचाही समावेश केला जातो. लोकप्रशासनाच्या व्याप्तीमध्ये सार्वजनिक प्रशासनयंत्रणा कोणकोणत्या कृती करतात? याचा समावेश तर होतोच पण त्या प्रशासन यंत्रणेची रचना कशी असते? तिने कोणत्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्यात? या प्रश्नांचाही त्यात समावेश होतो. प्रशासकीय संघटनेची तत्त्वे, संघटनाविषयक सिद्धांत हा लोकप्रशासनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याखेरीज व्यवस्थापन, नेतृत्व व कार्यकारी प्रमुख आणि त्याचे स्थान यांचा प्रशासनात अभ्यास केला जातो. आर्थिक प्रशासन या उपविषयात आर्थिक धोरणांच्या अंमलबजावणीचे प्रश्न, आर्थिक नियोजन, अर्थव्यवहारांचे नियंत्रण, मूल्यमापन या बाबींचा समावेश होतो. लोकप्रशासन आर्थिक धोरणे अंमलात आणीत असते.

आर्थिक प्रशासनातील शिस्त, कार्यक्षमता आणि लोकाभिमुखता यांच्यावरच सुविधांचे योग्य वाटप अवलंबून असते. गुंतागुंतीच्या आर्थिक प्रक्रियांमधील लोकप्रशासनाच्या सहभागामुळे लेखापरीक्षा, मूल्यमापन आणि आर्थिक नियंत्रण यांना अभ्यासात महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याखेरीज सेवकप्रशासन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उपविषयात प्रशासक वर्गाच्या भरती, प्रशिक्षणादी प्रश्नांचा विचार केला जातो. शासनयंत्रणेच्या अभ्यासापेक्षा प्रशासनयंत्रणेचा अभ्यास हा वेगळा विषय आहे. मानवी संबंधांना प्राधान्य देण्याच्या विचारातूनच संघटनेचा पर्यावरणलक्षी सिद्धांत मांडला गेला. संघटनेची रचना, कार्यपद्धती, अंतर्गत प्रश्न स्वतंत्रपणे विचार करण्यापेक्षा संघटना आणि सामाजिक पर्यावरण यांचा एकत्रित विचार केला पाहिजे. कारण संघटनेचे प्रश्न हे खरे पाहता तिच्या पर्यावरणाशी संलग्न असतात, या मुद्याकडे त्यामुळे लक्ष वेधले गेले. प्रशासकीय सेवकवर्गाची विभागणी तीन प्रकारांमध्ये केली जाते. प्रत्यक्ष अंमलबजावणीचे काम करणाऱ्या श्रेणिबद्ध सेवकयंत्रणेला कार्यकारी अभिकरण- लाइन एजन्सी म्हणतात. या सेवकयंत्रणेला आणि तिच्या प्रमुखांना सल्ला देण्याचे, पर्याय सुचविण्याचे काम करणाऱ्या सेवकवर्गाला सल्लागार अभिकरण- स्टाफ एजन्सी असे म्हणतात. प्रशासनाच्या अंतर्गत गरजा पूर्ण करणाऱ्या आणि अंतर्गत सेवा पुरविणाऱ्या यंत्रणेला साहाय्यक अभिकरण- ऑग्झिल्यरी एजन्सी म्हणतात. या तिन्हींच्या कामाच्या स्वरूपात फरक असतो. कार्यकारी अभिकरणाचा बाह्य समाजाशी सतत संपर्क येतो. नियमन आणि सुविधा पुरविणे, या दोन्ही प्रकारे हा संपर्क असू शकतो. उरलेल्या दोन अभिकरणांचा लोकांशी येणारा थेट संपर्क अगदी मर्यादित असतो. सल्लागार अभिकरण हे धोरणे, त्यांच्या अंमलबजावणीची पद्धत, भरती-बढती, शिस्तपालन वगैरे बाबींविषयी कार्यकारी प्रमुखाला सल्ला देते. त्याचा प्रत्यक्ष अंमलबजावणीशी संबंध येत नाही. साहाय्यकारी अभिकरण लोकांशी सर्वांत कमी संबंध येणारी यंत्रणा होय. ती फक्त प्रशासनांतर्गत सेवा पुरवीत असते. सेवकभरती कार्यकारी प्रमुखाच्या मर्जीप्रमाणे न होता गुणवत्तेच्या आधारे व्हावी आणि ती सर्वांसाठी खुली असावी, हे तत्त्व आता सर्वमान्य झाले आहे. लोकप्रशासनातील सेवकाला सार्वजनिक हिताची जाण असावी, प्रत्यक्ष सत्तास्पर्धेपासून तो दूर असावा, त्याच्याकडे कार्यक्षमता आणि व्यवस्थापन कौशल्य असावे, असे सामान्यतः मानले जाते. व्यक्तींची निवड निःपक्षपातीपणे व्हावी, म्हणून अधिकाधिक वस्तुनिष्ठ पद्धतीने उमेदवारांच्या ज्ञानाची आणि व्यक्तीमत्वाची चाचणी घेणारी तंत्रे वापरली जातात. आधुनिक काळात लोकप्रशासनाचे वाढत असलेले कार्यक्षेत्र लक्षात घेता शासकीय सेवकवर्गाचे वाढते महत्त्व, त्यांचा धोरण प्रक्रियेतील सहभाग, प्रशासन-समाज परस्परसंबंध अशा अनेक मुद्यांचा विचार होणे अपरिहार्य झाले आहे. प्रशासनाच्या व्याप्तीमुळे प्रत्यक्ष सेवा पुरविण्यापेक्षा कामकाजाच्या विशिष्ट कार्यपद्धतींना मिळणारे प्राधान्य आणि प्रशासनाचे कमी होत जाणारे उत्तरदायित्व, यांसारखे प्रश्न ही लोकप्रशासनाच्या अभ्यासकांपुढील मुख्य आव्हाने आहेत. परिपूर्ण आणि पूर्णपणे तर्कशुद्ध नोकरशाहीचे प्रारूप- मॉडेल मांडले असले, तरी या प्रश्नांची जाणीव होती. आधुनिक यांत्रिक जीवनात नोकरशाहीचे स्थान वाढणे अपरिहार्य आहे, असे सुचविले असले, तरी काटेकोरपणा आणि गुप्तता यांसारख्या गोष्टींच्या अतिरेकावर टीका पण केली जाते.

# भारत आनंदी का नाही ?

आधुनिक केसरी

**२६ मार्च हा दिवस जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक अहवाल प्रसिद्ध केला जातो. २०१२ पासून हा अहवाल प्रसिद्ध केला जातो. यावर्षी या अहवालाची बारावी आवृत्ती प्रसिद्ध करण्यात आली. ही यादी तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या गटाकडून विशिष्ट पद्धतीचा अवलंब करण्यात येतो.**

भ्रष्टाचाराविषयी नागरिकांचे मत, आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणण्याचं स्वातंत्र्य, आयुर्मान, सामाजिक पाठिंबा, जीडीपी, राहण्याच्या ठिकाणाविषयीचे समाधान अशा काही बाबींचं मूल्यमापन ही यादी तयार करताना केलं जातं. दरवर्षीची यादी तयार करण्यासाठी प्रामुख्याने पहिल्या मागील तीन वर्षामधील परिस्थितीचा आढावा घेतला जातो. या निकषांवर देशांना ० ते १० या दरम्यान मूल्यांकन दिलं जातं. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग पाचव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. फिनलँडच्या पाठोपाठ डेन्मार्क, आईसलँड, स्वित्झर्लंड, नेदरलँड, लेक्झमबर्ग, स्वीडन, नॉर्वे, इस्राईल आणि न्यूझीलंड या नऊ देशांचा क्रम लागतो. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४६ देशांच्या यादीत भारत १३६ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ आणि श्रीलंका यासारख्या देशात सध्या मोठया प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत त्याचवेळी भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेचीच बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग पाचव्यांदा अनादी देशाचया यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावांचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि समानता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे समानता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीचे असले तरीही. फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारततही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# इतरांच्या मतांबद्दलच चिंतन थांबवा दु:खाचा मोठा स्रोत संपुष्टात येईल

आधुनिक केसरी


अमुक आपल्याविषयी काय बोलला तमुक काय बोलला मग का बोलला असेल मग कारणं काय हेतु काय यावर आपण इतक व्यर्थ चिंतन करतो कि जीवनातील अमुल्य किंमती वेळ नको त्या चिंतनात घालवतो आणि पदरी काय पडतं तर दुःख याचं चिंतनातून निर्माण होणार दुःख आपल्या जीवनातील दुःखांचा खुप मोठा स्त्रोत आहे आणि हा स्त्रोत फक्त आपला विवेक संपुष्टात आणू शकतो म्हणून आपला विवेक हा सदैव जागृत असला पाहिजे. मग बोलणारा हा त्यांच्या कड असणार्या सामर्थ्य नुसार बोलला त्याने काय बोलावं हे आपण ठरवू शकत नाही.पण आपण काय स्वीकारायचं हे तर आपण ठरवू शकतो .मग आपण ते बोलण न स्वीकारता दुर्लक्ष केलं पाहिजे. पण असं होतं नाही त्याच्या बोलण्याकड आपण इतकं लक्ष का देतो तर आपला विवेक जागृत नसतो. म्हणून आपण इतकं गांभीर्याने याकडे पाहतो.आणि नको ते दुःख जीवनात ओढावून घेतो.इतरांच्या मताचा अथवा बोलणयाचा आपल्यावर आपण परिणाम करुन घेणं म्हणजे आपण स्वतः आपल्या पायावर दगड पाडून घेतल्या सारख आहे .इतरांची मतं हि त्यांच्या सामर्थ्य नुसार असतात मग त्या विषयावरून आपण स्वतःला दुःखी कारण उचित ठरणार नाही. इतरांच्या मताचा परिणाम होऊ देयचा नसेल तर आपला विवेक सदैव जागृत असला पाहिजे.दैनंदिन जीवनात अनेक लोकांशी आपला संपर्क येतो.आणि संवाद पण होतो संवादातील अनेक शब्द वाक्य आपल्याला डोक्यात घुमतात आणि आपली स्थिरता बिघडवतात पण आपण सचेत असलं पाहिजे बोलणारा त्याच्या बौद्धिक क्षमतेनुसार बोलत असतो आपण ते स्वीकारलं पाहिजे असं आपल्यावर बंधनं नसतं मग त्याच बोलण आपण स्वीकारण्याच काही करणं नाही. आशा आपला विवेक जागृत असला पाहिजे.जेणेकरून आपण डिस्टर्ब होणार नाहीत.जीवनातील तणावाचं मुख्य कारण इतरांकडून आपल्या संदर्भात झालेलं वक्तव्य अथवा मत आपण एवढं मनावर घेतो कि आपण दुसर्याच्या मतांबद्दल स्वतःला त्रास करून घेतो. कधी कधी हा तणाव टोकाला जाऊन आपलं प्रचंड नुकसान करतो .आपण फक्त पाहत राहतो. व नुकसान होऊ देतो. मुळात आपण हे नुकसान होऊ देता कामा नये.दैनंदिन जीवनात आपला कळतं न कळत कित्येकांशी प्रत्यक्ष अ प्रत्यक्ष पणे संपर्क येणारच अनेक कार्य पार पाडण हे जीवन क्रमाचा भाग असल्याने संबंध येणार नाही असं होण शक्य नाही. याच दरम्यान बोलण्यातून अथवा व्यवहारातुन अनेकदा सहज अथवा जाणिव पुर्वक अशा कारणांमुळे काही शब्दांची देवाण घेवाण होते. ज्याची आपण कल्पनाच करू शकत नाही. साध्याची सामाजिक संस्कृती दिवसेंदिवस बिघडत आहे.आपण स्वतः ला वजा करून इतरा बदल मत नोंदविण्याची पद्धत बदलत चालली आहे. इतरांशी बोलताना सामाजिक सौजन्य संपुष्टात येत चालले आहे. अस होत असताना त्याचे परिणाम आपल्या स्वस्थावर होत आहेत. आरेला कारे म्हणत कोण किती टोकाच बोलु शकतो हि जणुकाही स्पर्धा लागली आहे. देणे हा त्याचा धर्म आहे.पण घेणे हा आपला धर्म नाही .आपण ते स्वीकारलंच पाहिजे असं काही आपल्यावर बंधनं नाही मग आपण कशासाठी त्यावर उतावीळ असतो . आपल्याला इतरांकडून जे काही मिळालं ते स्वीकारताना आपला विवेक जागृत असला पाहिजे तो जागृत असेल तर मग इतरांकडून आपणांस चांगलं वाईट काहि हि मिळालं तरी त्यातील योग्य तेच आपण स्वीकारणार एवढं मात्र निश्चित.

**गणेश खाडे, 9011634301**

# जत तालुक्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट

आधुनिक केसरी न्यूज

**जत :** तालूक्यातील अनेक गावात बोगस डॉक्टर आपले दवाखाने विनादिक्कत चालवत असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहेत. तालूक्यातील आसंगी (जत), सोरडी, वाळेखिंडी याठिकाणी प्रत्यक्ष पाहणीदरम्यान बोगस डॉक्टर असल्याचे आढळून आले आहेत. कोणतेही वैद्यकिय प्रमाणपत्र नसताना यांची दवाखाने कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहेत हाही प्रश्न सर्वसामान्याना पडलेला आहे.
सांगली जिल्ह्यात जत तालूका क्षेत्रफळाने मोठा व कर्नाटक सिमालगत असल्याने या भागात कोणतेही अवैद्य कारभार सहजगतेचे चालत असते. संबधित विभागही भ्रष्टाचाराने बरबटलेले असल्याने आर्थिक व्यवहारतून अशा अवैद्य व्यवसायांना खतपाणी घालण्याचे काम संबधित अधिकारी करीत असतात. तालूक्यात प्राथमिक आरोग्य केंद्रे, त्याअंतर्गत उपकेंद्रे असतानाही अशा गावामध्ये हे बोगस डॉक्टर आपले दवाखाने थाटून रूग्णांच्या जिवाशी खेळत आहेत. रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या बोगस डॉक्टरांवर आरोग्य विभागाचा कोणताही अंकुश नसून वैद्यकीय शिक्षण नसतानाही बोगस डॉक्टर बिनदिक्कतपणे तालूक्यात दवाखाने उघडत रुग्णांवर उपचार करत आहेत. या डॉक्टरांमुळे रुग्णांचे आरोग्यच धोक्यात आले असून चुकीच्या उपचारांमुळे एखादा रुग्ण दगावण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे वेळीच अशा डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची गरज आहे.



मात्र, तक्रार आल्यानंतरच आरोग्य विभागाकडून कारवाईचे पाऊल उचलले जात असल्याचे सांगितले जात आहे.
बोगस डॉक्टरांवर अंकुश आणण्यासाठी ग्रामीण भागात दवाखाना सुरू करण्याची परवानगी देताना ग्रामपंचायत अथवा नगरपंचायत यांनी ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी संबंधित डॉक्टरची शैक्षणिक अर्हता आणि अन्य कागदपत्रे तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे तपासणीसाठी पाठवणे गरजेचे असते मात्र संबधित ग्रामपंचायत याबाबत कोणतीच खबरदारी घेत नाहीत. बोगस डॉक्टर ग्रामीण भागात तसेच शहरातील झोपडपट्टी परिसरात दवाखाने थाटून बेकायदा वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे अनेकदा उघडकीस आले आहे. गोरगरिबांना तज्ज्ञ डॉक्टरांची फी परवडत नाही. बोगस डॉक्टरांची फी कमी असल्याने रुग्ण उपचारासाठी या डॉक्टरांकडे जातात. हा डॉक्टर बोगस असल्याचे रुग्णांनाही कळत नाही. शिवाय, रुग्णही डॉक्टरच्या शैक्षणिक पात्रतेविषयी जास्त चौकशी करीत नाहीत. आरोग्य विभागाकडून शहरातील तसेच ग्रामीण भागातील प्रत्येक डॉक्टरकडे चौकशी होत नसल्याने वर्षानुवर्षे बोगस डॉक्टर उघडपणे व्यवसाय करत असल्याचे दिसून येते. बोगस डॉक्टरांची मोठी डोकेदुखी वर्षानुवर्षे कायम असून 'बोगस डॉक्टरमुक्त' जिल्हा करण्यासाठी आरोग्य विभागाकडून फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. परिणामी, जिल्ह्यात अधूनमधून बोगस डॉक्टर सापडतात.

तालूक्यात जत व माडग्याळ येथे कोट्यावधी रूपये खर्च करून प्रशस्त अशी ग्रामिण रूग्णालये बाधलेली आहेत पण याठिकाणी वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी वर्ग नसल्याने ही इमारते फक्त बघण्यासाठीच झाली आहेत का हा सवाल सर्वसामान्यांना पडलेला आहे . सरकारी वैद्यकिय सुविधा पुर्णपणे कोलमडल्याने खाजगी दवाखान्यातून रूग्णांची लूट होताना दिसत असते . तालूक्यात मोठ-मोठे सरकारी दवाखाने असताना पुरेसा कर्मचारीवर्गच उपलब्ध नसतात . डॉक्टरांची मागणी करण्यास गेले असता कर्मचारी तुमच्या गावात काम करण्यास इच्छूक नाही अशी उत्तरे दिली जातात . निवडणूकीपुर्वी मोठमोठी आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी ही या जनतेच्या आरोग्यासारख्या मुलभूत गरजेकडे कानाडोळा करताना दिसतात . सद्यातरी जत तालूक्यातील जनतेचा जिव या बोगस डॉक्टरांच्या व रूग्णांची प्रचंड आर्थिक लूट करणाऱ्या डॉक्टरांवरच अवलंबून आहे असे चित्र आहे .



# भोकर ओबीसी समन्वयक समितीच्या वतीने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** जिल्हा काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या सरचिटणीस पदी बी. आर. पांचाळ यांची तर भोकर तालुका ओबीसी अध्यक्षपदी बालाजी शानमवाड यांची निवड झाल्याबद्दल भोकर तालुका ओबीसी समन्वय समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.
माजी मुख्यमंत्री काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाचे अध्यक्ष भानुदास माळी, यांच्या आदेशानुसार प्रदेश उपाध्यक्ष एड. जे. पी. पाटील, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गोविंद शिंदे नागेलीकर, ओबीसी जिल्हाध्यक्ष रोहिदास जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार काँग्रेस ओबीसी विभागाच्या जिल्हा सरचिटणीस पदी बी. आर. पांचाळ भोकर तालुका अध्यक्ष पदी बालाजी शानमवाड यांची निवड करण्यात आली या निवडी बद्दल तालुका ओबीसी समन्वय समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.
यावेळी ओबीसी नेते नामदेवराव आयलवाड, सरपंच संघटना तालुका अध्यक्ष माधवराव अमृतवाड, राजेश अंगरवार, सुरेश बिल्लेवाड, जगन आलेवाड, सरपंच मोहन राठोड, सरपंच राजू बुलबुले, अंबादास आटपलंवाड, ज्ञानेश्वर गोदेवाड, रोहिदास राठोड, रोहिदास आडे, उत्तम चव्हाण, कमलाकर बरकमकर, गजानन गाडे, सुनील मदनवाड, रूकमाजी मुंगसे, दर्शन पाटील डूरे, संतोष अनेराये आदींची उपस्थिती होती.

# महसूल अधिकाऱ्यांचे ३ एप्रिलपासून आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांनंतर आता महसूल अधिकाऱ्यांनीही आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. येत्या ३ एप्रिलपासून महसूल विभागाचे अधिकारी बेमुदत कामबंद आंदोलन करणार आहे.
या राज्यव्यापी आंदोलनात उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदारही सहभागी होणार आहेत.
सन १९९८ पासूनचा नायब तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांवरील अन्याय दूर करावा, त्यांना राजपत्रित अधिकाऱ्यांची वेतनश्रेणी लागू करावी, या मुख्य मागणीकरिता हे बेमुदत आंदोलन करण्यात येणार आहे.
यापूर्वी राज्य तहसीलदार व नायब तहसीलदार संघटनेने मागील ३ मार्च रोजी सरकारला इशारा पत्र दिले होते.
त्यानंतर १३ मार्च २०२३ रोजी राज्यभरात सामूहिक रजा व विभागीय आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. मात्र याचीही दखल घेण्यात न आल्याने कामबंद आंदोलन अटळ ठरल्याचे संघटनेच्या वरिष्ठ सूत्रांनी सांगितले.

# तृतीयपंथीयांना धाक दाखवून हप्ता वसुली

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** रेल्वेच्या मेल, एक्स्प्रेस रेल्वे गाड्यांमध्ये भिक्षा मागून उदरनिर्वाह करणाऱ्या तृतीयपंथीयांना इगतपुरी येथे शस्त्राचा धाक दाखवून हप्ता वसुली करणाऱ्या दोन गुन्हेगारांना पोलीस निरीक्षक राजू सुर्वे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने पाठलाग करून पकडून त्यांच्या मुसक्या आवळल्या. या घटनेतील एक जण पळून गेला. रविवारी इगतपुरी बस स्थानक परिसरात रेल्वे प्रवासी गाड्यांमध्ये भिक्षा मागणारे तृतीयपंथी बसलेले होते. यावेळी या ठिकाणी तीन युवक कोयता आणि धारदार शस्त्र घेवून आले. प्रत्येक तृतीय पंथीयास शस्त्राचा धाक दाखवून हप्तावसुली करत होते. आज धंदा झाला नाही, उद्या देतो, अशी विनवणी तृतीयपंथीयांकडून करण्यात येत होती. परंतु, युवक ऐकायलाच तयार नव्हते.

# खामगावच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक वसाहतीस भेट

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** फुलंब्री तालूक्यातील खामगाव येथील श्री गोरक्ष शैक्षणिक बहुउद्देशीय संस्था संचलित श्री गोरक्ष कॉलेज ऑफ फार्मसी आणि शेनफडू फकिरबा सोनवणे फार्मसी महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांनी औद्योगिक वसाहत छत्रपती संभाजीनगर येथे भेट दिली.
औषधनिर्माणशास्त्र प्रथम वर्ष पदविका वर्षातील विद्यार्थ्यांनी मंगळवारी शोध ADVANTACH छत्रपती संभाजीनगर येथे घेऊन प्रथम विद्यार्थ्यांना विविध आधुनिक विश्लेषण तंत्र त्यासाठी लागणारे कौशल्य, साहित्य,फार्मास्युटिकल विश्लेषणात्मक तंत्र उपकरणे आणि साधन आदी बाबत सखोल माहिती मैत्रेय सर यांनी विद्यार्थ्यांना दिली.तसेच उद्योग उभारण्यासाठी लागणारी साधनसामुग्री, आर्थिक नियोजन याबद्दल अधिक माहिती देण्यात आली. या भेटी दरम्यान अनेक औषध निर्माण कंपन्यातील वेगवेगळ्या उत्पादनांसाठी चालणाऱ्या कार्यप्रणाली विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या उपकरणाचे तसेच कार्याची माहिती घेता आली. तसेच विद्यार्थ्यांनी याबद्दल अभ्यास व निरीक्षणही केले.तसेच संस्थेचे अध्यक्ष मोहन पाटील, अभिलाष सोनवणे सर यांनी विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट घडून देण्यास खूप मोलाचे सहकार्य केले. त्यावेळी प्राचार्य. डॉ. संतोष शेप, प्राचार्य भगवान काळे,शरद जोशी, प्रा. दीपक भोजने, प्रा. अश्विनी पवार, प्रा. सोनाली कलम, प्रा. बागेश्वरी जिवरग, प्रा. अतुल काळे, प्रा. मेघा बनकर, सचिन गोंडाळ यांची उपस्थिती होती.




# वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी पीएम मित्र मेगा टेक्सटाईल पार्क गरजेचे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदाबाद :** अलीकडेच भारत सरकारने भारतातील सात राज्यांमध्ये पीएम मित्र मेगा टेक्सटाईल पार्कची घोषणा केली. या टेक्सटाईल पार्कच्या स्थापनेसह, सरकार वस्त्रोद्योग मूल्य साखळी एका परिसंस्थेमध्ये सुव्यवस्थित आणण्याचा प्रयत्न करत आहे. तामिळनाडू, तेलंगणा, गुजरात, कर्नाटक, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र ही अशी राज्ये आहेत जिथे 4,445 कोटी रुपयांच्या पीएम मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रिजन्स अँड अपेरल (PM MITRA) योजनेअंतर्गत मेगा-पार्कची घोषणा केली जाणार आहे. हे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या 'मेक इन इंडिया' आणि 'मेक फॉर द वर्ल्ड' च्या दृष्टीला चालना देईल.



वस्त्रोद्योग क्षेत्रातील दिग्गजांनी या घोषणेचे स्वागत केले आहे आणि भविष्यातील संधीची ते वाट पाहत आहेत. विशाल फॅब्रिक्स लिमिटेडचे सीईओ श्री विनय थडानी म्हणाले, "ही घोषणा वस्त्रोद्योगासाठी गेम चेंजर ठरू शकते. गती शक्ती मिशनवर आधारित, पीएम मित्र मेगा टेक्सटाईल पार्कसाठी गुजरातची निवड करण्यात आली आहे. वस्त्रोद्योगाच्या संदर्भात गुजरातमध्ये अद्वितीय सामर्थ्य आहे, ज्यात वस्त्रोद्योग हा गुजरातच्या वारशाचा भाग आहे. गुजरात सर्वात मोठे कापूस उत्पादक राज्य तसेच सिंथेटिक टेक्सटाइल हब आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या पाठिंब्याने गुजरातमधील वस्त्रोद्योग निश्चितपणे झेप घेणार आहे. ही टेक्सटाईल पार्क्स एकात्मिक टेक्सटाईल व्हॅल्यू चेन असण्याची उत्तम संधी देईल ज्यामुळे परदेशी गुंतवणूक आकर्षित होईल. पीएम मित्र मेगा टेक्सटाईल पार्क्स फार्म टू फायबर टू फॅक्टरी टू फॅशन टू फॉरेन या ५ एफ अनुषंगाने वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना देतील. पीएम मित्र योजनेच्या पहिल्या टप्प्यांतर्गत, हे मोठे टेक्सटाईल पार्क किमान 1,000 एकरमध्ये विस्तारलेले असतील. या टेक्सटाईल पार्क्समधून वस्त्रोद्योगासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत. हे टेक्सटाईल पार्क्स एकात्मिक टेक्सटाईल व्हॅल्यू चेन तयार करतील ज्यामध्ये कापड, विणकाम, प्रक्रिया/रंग आणि छपाई ते एकाच ठिकाणी कापड उत्पादनासाठी अशा प्रकारे लॉजिस्टिक खर्च कमी होईल. या प्रत्येक टेक्सटाईल पार्कने आपापल्या राज्यांना जागतिक नकाशावर आणणे अपेक्षित आहे. या 7 टेक्सटाईल पार्कमधून सुमारे 20 लाख नोकऱ्या निर्माण होतील अशी अपेक्षा आहे.

# लोककलेतून 'एचआयव्ही' जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा एड्स नियंत्रण विभाग रुगणालय धुळे अंतर्गत जिल्ह्यामध्ये भारत सरकार व महाराष्ट्र शासन पंजिकृत वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड नोंद तथा मा. राज्यपालांच्या हस्ते जागतिक दर्जाच्या पुरस्काराने सन्मानित असणारे आनंदतरंग कलापथकाचे शाहीर उत्तम गायकर आणि त्यांचे सहकारी यांच्या लोककलेच्या माध्यमातून एच.आय.व्ही. एड्स या आजारा संदर्भात विशेष जनजागृती करण्यात येत आहे. तर फागणे गावात जनजागृती मोहीम राबविण्यात आली. याप्रसंगी फागणे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा कार्यक्रम अधिकारी शितल पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार सदर हा कार्यक्रम राबवण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी लोक कलावंत यांच्या समवेत महापालिका आरोग्य विभागाच्या समुपदेशक नम्रता अहिराव ह्या अधिक परिश्रम घेताना दिसून आल्या. एड्स पासून मुक्ती होण्यासाठी असुरक्षित लैंगिक संबंध टाळला पाहिजे. नियमित ART ची औषध घेतली पाहिजे.याकरता लाज, भीती, गैरसमज न ठेवता आयसीटीसी अर्थात एकात्मिक सल्ला समुपदेशन केंद्रामध्ये गेले पाहिजे. एचआयव्हीचा जास्तीत जास्त धोका स्थलांतरित कामगार, ट्रक ड्रायव्हर, समलिंगी संभोग करणारे,




त्याबरोबर वेश्याव्यवसाय आणि ड्रग्ज घेणारे हे संक्रमित होऊ शकतात. लोकसंख्या नियंत्रण व गुप्तरोगास बंधन आणि नको असलेली गर्भधारणा याबरोबर असुरक्षित लैंगिक संबंध, संक्रमित सुई बंद झाली पाहिजे. त्यासाठी एकात्मिक सल्ला केंद्रामध्ये मोफत समुपदेशन करून यासाठी औषध उपचार केले जातात. याबरोबरच संयम पाळून स्वतःची तपासणी केली पाहिजे. नियमित निरोधचा वापर केला पाहिजे. स्वतःची काळजी घेतली पाहिजे अशा प्रकारचे आवाहन व सूचना या लोककलेच्या माध्यमातून करण्यात आले आहेत या कार्यक्रमासाठी शाहीर उत्तम गायकर सुप्रसिद्ध व्याख्याते समाधान हेंगडे-पाटील, भारुडकार शिवाजी गायकर, शंकरराव दाभाडे, देविदास साळवे, सीताराम जाखेरे, रामकृष्ण मांडे, दुर्गेश गायकर इत्यादी कलावंत व मनपाच्या समुपदेशक नम्रता अहिराव हे सर्वजण परिश्रम घेत आहे.

# लाचलुचपतचा खुलताबाद कृषी कार्यालयावर छापा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** लाचलुचपत प्रतिबंधक पथकाचा खुलताबाद तालुका कृषी कार्यालयात छापा, तालुका कृषी अधिकारी शिरीष घनबहादुर, मंडळ कृषी अधिकारी विजयकुमार नरवडे, कंत्राटी ऑपरेटर सागर नलावडे, आणि कृषी अधिकारी वर्ग 2 बाळासाहेब संपतराव निकम यांना सोमवारी लाच 24 हजार 500 रुपये स्वीकारताना रंगेहात पकडले. याबाबत अधिक माहिती अशी की लालूचपत प्रतिबंधक पथकास तालुका कृषी अधिकारी कार्यालयात मोठ्या प्रमाणात येथील अधिकारी व कर्मचारी तसेच कंत्राटदार हे लाच घेऊन काम करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्या अनुषंगाने लालूचपत प्रतिबंधक पथकाचे पोलीस अधीक्षक संदीप आटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपाधीक्षक संदीप साबळे यांनी सापळा रचून वरील तालुका कृषी अधिकारी यांच्यासह मंडळ अधिकारी कृषी अधिकारी कंत्राटी ऑपरेटर यांना रंगेहाथ पकडले.

यात तक्रारदार हे ठिबक सिंचन साहित्याचे डीलर असून त्यांनी (पोखरा स्कीम )नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत विभागातील 35 शेतकऱ्यांना कृषी ठिबक सिंचन साहित्य पुरविल्याबाबतच्या संचिका विजय नरवडे मंडळ अधिकारी यांच्यामार्फत सादर न करता परस्पर तपासून घेतल्या होत्या. त्यामुळे स्टॉक रजिस्टर चेक करण्यासाठी व तक्रारदार यांचे विरुद्ध आलेला माहिती अधिकार अर्ज फाईल करण्यासाठी तसेच अनुदान प्राप्त 35 फाईल करिता प्रत्येकी सातशे रुपये फाईल याप्रमाणे 24 हजार 500 रुपये ची लाच मागणी केली. व त्यांचे सांगणे प्रमाणे सागर नलावडे यांनी सदर लाच रक्कम स्वीकारली. तसेच बाळासाहेब निकम कृषी अधिकारी यांनी मूळ लाच मागणीशिवाय अधिकचे 1000 रुपये हे स्टॉक रजिस्टर तपासण्यासाठी मागणी करून ते 1000 रूपये स्वीकारले. तसेच यातील तालुका कृषी अधिकारी शिरीष घनाबहादुर यांनी तक्रारदार यांचेकडून अधिकचे लाच पैसे स्वीकारावे याकरिता विजय नरवडे यांना प्रोत्साहन दिले, म्हणून वरील सर्व तालुका कृषी अधिकारी व कर्मचऱ्यांना ताब्यात घेतले असून लालूचपत प्रतिबंधक पथकामार्फत गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

या छाप्यात पोलीस हवालदार भीमराज जीवडे, पो ना पाठक , चालक पोलीस अंमलदार शिंदे, बागुल ला.प्र.वि, औरंगाबाद यांनी कामगिरी बजावली.

# माधवी कुंटे यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्येष्ठ साहित्यिका माधवी कुंटे लिखित 'ऐसा गणेश मंगलमूर्ती' व 'आदियुग्म' या दोन पुस्तकांचे प्रकाशन सुप्रसिद्ध साहित्यिक एकनाथ आव्हाड व ज्येष्ठ साहित्यिका गौरी कुलकर्णी यांच्या हस्ते नुकतेच विलेपार्ले येथे साई मंदिराच्या प्रसन्न सभागृहात संपन्न झाले. एकनाथ आव्हाड यांनी 'आदियुग्म' या कादंबरीचे मर्म उलगडत अनेक दाखल्यांसह सुंदर विवेचन केले तर गौरी कुलकर्णी यांनी 'ऐसा गणेश मंगलमूर्ती' या पुस्तकाची वैशिष्ट्ये आपल्या मनोगतातून उलगडली. संत साहित्य अभ्यासक उज्ज्वला बोरकर यांनी शुभेच्छा दिल्या. सुरेखा प्रधान यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात मधुरांजली तर्फे बहारदार भक्तिगीतांचा कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमास पुस्तकाचे चित्रकार अनिष दाते, डिंपल पब्लिकेशनचे प्रकाशक कौतुक मुळे यांच्या सह अनेक साहित्यिक व साहित्य रसिक आवर्जून उपस्थित होते.



# शिवाजी महाविद्यालयास 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार'

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्यातील वनेतर क्षेत्रात वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती तसेच संस्थांना देण्यात येणाऱ्या 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार' या २०१८ - २०१९ साठीचा राज्यस्तरीय पुरस्कार श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड यांना तृतीय पुरस्कार प्राप्त केला असून त्याचे वितरण महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पुण्यात (दि.26 मार्च,2023) यशवंतराव चव्हाण प्रबोधिनी (यशदा) या संस्थेत पार पडला, कार्यक्रमाला पुणे जिल्ह्याचे संपर्कमंत्री मा. श्री. चंद्रकांत पाटील, वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, सामाजिक वनीकरणच्या मुख्य वनसंरक्षक डॉ. सुनिता सिंग आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री. अशोक अण्णा आहेर, कोषाध्यक्ष श्री. चंद्रकांतजी देशमुख, प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले तसेच एन.सी. सी. मा. विभाग प्रमुख कॅप्टन प्रा. व्ही. के. देशमुख यांनी संस्थेच्या वतिने पुरस्कार स्वीकारला.

पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्हा व तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. वीस वर्षापूर्वी नापिक आणि खडकाळ असणारा हा महाविद्यालयीन परीसर आज दुर्मिळ वनस्पती, नारळ, फणस, जांभुळ, लिंब, साग, पिंपळ, वड, चंदन, शेवगा, नीलगिरी, शिसम, आपटा, सीताफळ, आवळा, पळस, गोकर्ण, बेहडा, आडुळसा, मोह, धावडा, करवंद, चाफा, टेंभुर्णी आदी हजारो वृक्ष व वेलींना बहरला आहे. वर्ग गॅलरी व विंग मध्ये हजारो कुंड्यामध्ये विविध वर्ग समूहातील झाडे मुलांचे लक्ष वेधून घेतात. शाळा - महाविद्यालयातील 'मुले आणि फुले' ही संकल्पना महाविद्यालयाने प्रत्यक्षात आनली आहे. परिसर 'ऑक्सिजन पार्क' बनला आहे. महाविद्यालयीन परिसरा सोबत कन्नड शहर व तालुक्यातील ग्रामीण भागात वृक्ष संवर्धन आणि लागवडीचे कार्य महाविद्यालयाच्या वतिने केले जाते. कन्नड स्मशानभूमी, कन्नड तालुक्यातील विविध खेड्यात विद्यार्थ्यांना सहकार्याने वृक्षलागवड, संगोपन, वनराई बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम सहभाग घेतला आहे. विद्यार्थी विविध झाडांच्या बीया एकत्र करून त्यांचे सीड बॉल तयार करून पावसाळ्याच्या सुरुवातीला गौताळा अभयारण्यात, परिसरातील डोंगरावर टाकून बियांचे व वृक्षारोपण करण्यात येते. या सर्व कार्याची दखल घेत संस्थेला महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय तृतीय पुरस्कार प्रदान केला आहे. संस्थेच्या या यशाबद्दल संस्थाचे अध्यक्ष मानसिंह पवार तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी , महाविद्यालयीन प्राध्यापक, कार्यालयातील कर्मचारी, सेवक, प्रयोगशाळा परिचर, ग्रंथालय परिचर, एन. सी. सी. व एन. एस. एस. चे विद्यार्थी, वॉचमन आदी सर्व मंडळींचे मोलाचे सहकार्य, मार्गदर्शनामुळे हे शक्य झाले आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. विजय एन. भोसले यांनी केले आहे.





# सण-उत्सवानिमित्त शांतता कमिटी बैठक

## अधिकारी व सर्व जाती-धर्माच्या जबाबदार व्यक्तींची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** येणारा सण उत्सवानिमित्त होणारे वाद विवाद व प्रसिद्धी होल्डिंग संदर्भात काही प्रश्न व निराकरण करण्यात आले. त्या ठिकाणी काही वादग्रस्त प्रश्न विचारण्यात आले धुळे जिल्ह्यात काही वर्षांपूर्वी झालेल्या दंगली संदर्भात मुद्दे मांडण्यात आले. त्या बैठकीत बीजेपीचे हिरामण गवळी यांनी काही मुद्दे मांडले की काही समाजात दोन गटात वाद-विवाद झाल्यानंतरही शांतता कमिटी बैठक झाली पाहिजे. व त्या ठिकाणी असे म्हणाले की शिवजयंतीच्या वेळेस झालेल्या दगडफेकीत कुठल्याही मुस्लिम समाजाच्या नेत्यांनी किंवा त्यांच्या धर्मगुरूंनी त्यांचा निषेधही करण्यात आला नाही किंवा विरोध केला नाही असा आरोप हिरामण गवळी यांच्याकडून करण्यात आला. या बैठकीत आनंद लोंढे यांनी आगळावेगळा प्रश्न उपस्थित केला की सध्या धुळे शहरात अतिक्रमण काढण्याची कारवाई सुरू आहे परंतु धुळे जुनी महानगरपालिकेच्या आवारात एक हॉस्पिटल आहे त्यात गरोदर माता भगिनी येत असतात परंतु त्या ठिकाणी मागच्या गेटला कुलूप लावून बीजेपी च्या काही कार्यकर्त्यांनी संपूर्ण अतिक्रमण करण्यात आले आहे त्यामुळे अनेक गर्भवती महिलांना त्रास होत आहे ते अतिक्रमण हे काढण्यात यावे अशी विनंती ही करण्यात आली. सर्व समाजाच्या कार्यक्रमात गालबोट लागू नये म्हणून प्रत्येक समाजाच्या नागरिकांची जबाबदारी असते व त्यांनीही पार पाडावी. व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण समाजावर उपकार केले आहेत हेही इतर समाजाच्या व्यक्तींनी लक्षात ठेवणे गरजेचे आहे असे महापौर यांनी या बैठकीत सांगितले.

प्रत्येक समाजाच्या समस्या सोडण्यासाठी मिटिंग घेणे गरजेचे त्यात सण महोत्सव संपल्यावर मिटिंग घेण्यात यावी धुळ्याची मागची दंगल आम्हाला माहिती आहे पण मागचा विषय काढणे योग्य नाही पूर्वीच्या दगलीमध्ये सर्व धुळ्याच नाव खराब झाले म्हूणन असेया पुढे होई नये लक्षात असू द्या असे बीजी शेखर यांनी या ठिकाणी जनतेला आवाहन केले सर्व धर्माच्या व्यक्तीचे भाषण शांततेतच होते म्हणून त्यांचेही आभार मानले. आम्ही एकच धर्म मानतो एक फिर्यादी एक आरोपी हे लक्षात असुद्या. गुन्हेगारी स्वरूपाच कोणी ही वागू नये जिथे अशांतता असते तिथे विकास होत नाही उधोग धंधे येत नाही महापुरुषच्या जयंती करतो त्यात आपले फोटो मोठे असतात त्यांना असे वाटते कि आपली जयंती आहे असे वाटू देऊ नये म्हणून महापुरुषांचा फोटो नेहमी मोठा असुद्या त्यांची टीका होऊ देऊ नका असेही आवाहन बीजी शेखर यांनी केले ज्या प्रकारे पोलिसांना जात धर्म नाही त्याच प्रकारे गुन्हेगाराला जात धर्म नसतो म्हणून आरोप करताना कुठलेही जाती-धर्माचा उल्लेख करू नये अशाप्रकारे आईची बीजी शेखर यांच्यातर्फे सर्व समाज बांधवांना संबोधण्यात आले.

# हक्काचा शिक्षक मिळावा; विद्यार्थ्यांचे धरणे आंदोलन

## तीन तास विद्यार्थी उन्हात तर अधिकाऱ्यांची जाणीवपूर्वक दांडी

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** संपूर्ण राज्यभरात गाजलेल्या दोन तास अभ्यासासाठी या उपक्रमातील देगाव, ता. पंढरपूर या गावातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाची अचानक बदली करून विद्यार्थ्यांचे जाणीवपूर्वक शैक्षणिक नुकसान केल्यामुळे आमच्या हक्काचा शिक्षक आम्हाला मिळावा या मागणीसाठी पंढरपूर पंचायत समितीमधील गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयाबाहेर शेकडो विद्यार्थी व महिला पालकांनी आंदोलन केले होते. सकाळी साडेदहापासून हे आंदोलन सुरू झाल्यानंतर या कार्यालयातील गटशिक्षणाधिकारी महारुद्र नाळे जवळपास तीन तास इकडे फिरकले नाहीत. सकाळपासून दहा मिनिटात आलो पंधरा मिनिटात आलो असे ते सतत सांगत होते मात्र वाट पाहून पाहून विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. गेल्या दोन ते तीन तासांपासून पालक व विद्यार्थी साहेब येथील या आशेवर ताटकळत बसले असले तरीही शिक्षण विभाग व पंचायती समितीमधील गटशिक्षणाधिकारी यांना मात्र याचे कसलेच गांभीर्य नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे थेट शिक्षणमंत्र्यांनी अशा निर्ढावलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून आम्हाला न्याय द्यावा अशी आर्त हाक या आंदोलनातील महिला पालक व विद्यार्थ्यांनी दिली आहे. यावेळी



राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव श्रीकांत शिंदे, भाजपचे किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली हळनवर,राष्ट्रवादीचे महंमद वस्ताद, देगावचे सरपंच संजय घाडगे,राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष धनाजी घाडगे, झाकीर शेख यासह देगाव ग्रामस्थ पालक व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे व आपली गरिबी, आपल्या अडचणी दूर व्हाव्यात यासाठी या आंदोलनात सहभागी सर्वच माता-भगिनी पालक या रोजंदारीवर काम करणारे आहेत. रोजंदारीवर काम करून आपला उदरनिर्वाह भागवून आपल्या मुलांना शिक्षणाचा खर्च त्या करत आहेत.मात्र काल दिवसभर आंदोलन करावे लागल्याने या महिलांचा रोजगार बुडाला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी आम्ही तेही सहन करू असेही त्या सांगायला विसरल्या नाहीत.

**मूळ शिक्षकाला दिली पुन्हा पदस्थापना**

हे आंदोलन सुरू झाल्यानंतर देगाव जिल्हा परिषद शाळेतील शेकडो विद्यार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये ठिय्या आंदोलन करत घोषणांनी हे कार्यालय दणाणून सोडले होते . गटशिक्षणाधिकारी श्री महारुद्र नाळे हे आपल्या कार्यालयात आले असता नेहमीप्रमाणे सुरुवातीला त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिली मात्र विद्यार्थी व पालकांचा संताप पाहून त्यांनी सदर शिक्षकाला मूळ ठिकाणी पुन्हा अवधू होण्याचे आदेश दिले आहेत .

**मराठी शाळा बंद पाडण्याचा अधिकाऱ्यांचा डाव**

जिल्हा परिषदेच्या शाळा टिकाव्या व गुणवत्तापूर्ण व्हाव्या यासाठी आपल्या शिक्षणमंत्र्यांनी खूप चांगले व धाडसी निर्णय घेतलेले आहेत . मात्र असे असले तरी पंढरपूर पंचायत समितीमधील काही निर्ढावलेल्या अधिकाऱ्यांमुळे जाणीवपूर्वक या शाळा बंद पाडण्याचा डावा आखला जात आहे . त्यामुळे अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करून मराठी शाळा टिकावयासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे .
**गणेश लेंडवे, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, देगाव**



# राष्ट्रीय समाजभूषण पुरस्काराने डॉ. संजय पुरी सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** वैद्यकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत राजवैद्य सोशल फाउंडेशन, परभणी यांच्या वतीने येथील डॉ. संजय पुरी यांना राष्ट्रीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.
सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून देशाचे विकासात्मक ध्येय डोळ्यासमोर ठेवून वैद्यकीय , सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत हा राष्ट्रीय समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे दिलेल्या सन्मानपत्रात नमूद करण्यात आले आहे. माजी महापौर प्रताप देशमुख, सिने अभिनेते अनिल मोरे, समाजसेवक आर. डी. मगर, स्वागताध्यक्ष संगिता जामगे पुरस्कार निवड समिती अध्यक्ष अजमत खान, संस्थापक अध्यक्ष डॉ. एस. एन. राव यांच्या सह्या आहेत.
दरम्यान या पुरस्काराबददल लाल बहादुर शास्त्री महाविदयालयाचे माजी प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे यांच्या प्रमुख उपस्तीतीत पंताजली आयुर्वेद चे डॉ . दिपक दिरंगे यांच्या वतिने डॉ . पुरी यांना गौरविण्यात आले यावेळी राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष पत्रकार बालाजी ढोबळे, अर्जुन पाडेवार यांची उपस्तीती होती . अपल्या मनोतात डॉ. भगवान दिरंगे यांनी म्हटले की, डॉ. संजय पुरी यांचे वैद्यकीय क्षेत्रात जितके कार्य आहे तिकेचं सामाजिक क्षेत्रात ही त्यांचे मोठे योगदान असुन भटक्या व दुर्लेक्षित समाजासाठी त्यांनी उभारलेली चळवळ उल्लेखनीय असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. डॉ. पुरी यांनी कधीचं प्रसीध्दीसाठी कुठले कार्य केले नसुन दैनदिन जिवनात देखील ते गुप्तपणे आजही अनेकांना मदतीची भावना ठेवत असल्याचे ते म्हणाले. यामुळे ते सन्मानास पात्र असून याचा परतुकरांना सार्थ अभिमान असल्याचे गौरद्बोगार त्यांनी यावेळी काढले. दरम्यान पंतजली आयुर्वेद च्या वतिने त्यांचा शाल श्रिफळ देत सन्मान करण्यात आला.

# पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने भाडे व करवसुलीसाठी ४ गाळे सील

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** नगर परिषदेच्या वतीने शहरातील मालमत्ता धारक व शॉपिंग सेंटरमधील गाळेधारक यांच्याकडे मोठ्या प्रमाणात कराची व गाळे भाड्याची रक्कम थकीत राहिल्याने विशेष वसुली पथकाद्वारे वसुली मोहीम हाती घेण्यात आली आहे.
नगरपरिषदेने थकीत मालमत्ताधारक व गाळेधारक यांना मागणी बिल, जप्तीपूर्व सूचना नोटीसीद्वारे वारंवार कराची रक्कम व गाळे भाड्याची रक्कम भरणे बाबत सूचना देऊन सुद्धा त्यांनी कराची व गाळे भाड्याची रक्कम न भरल्याने आज गिरीश हनुमंत काळे, श्रीकांत बलभीम अवधूतराव, रवी शंकर घाडगे, गणपत राजाराम कदम यांचे गाळे स्वतः मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी या नेमलेल्या विशेष वसुली पथकाद्वारे त्या ठिकाणी जाऊन सील केले तसेच पंधरा ठिकाणचे 2 नळ कनेक्शन ही तोडण्यात आले संपूर्ण नगरपालिका प्रशासन हे कर व भाडे वसुलीसाठी ॲक्शन मोडवर आल्याने मालमत्ताधारक व गाळे धारकांनी भाडे व कराची रक्कम भरण्यास सुरुवात केली आहे यावेळी बोलताना मुख्याधिकारी अरविंद माळी



यांनी सांगितले की उद्यापासून ही मोहीम अजून कडक करण्यात येणार असून गाळेधारक अथवा मालमत्ताधारकांनी आपली कराची व गाळे भाडेची थकीत व चालू वर्षाची रक्कम त्वरित नगर परिषदेकडे भरावी अन्यथा त्यांच्यावरही जंगम मालमत्ता जप्तीसारखी कटू कारवाई करण्याचा निर्णय घ्यावा लागेल इशारा दिला असून मालमत्ता धारक व गाळेधारक यांनी कराची व गाळे भाड्याची रक्कम त्वरित भरून नगर परिषदेस सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी केले आहे. या कारवाईच्या वेळी उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर व कर अधिकारी बाळासाहेब कांबळे वॉरंट लिपिक संभाजी देवकर, प्रभाग लिपिक पांडुरंग देवमारे, विजय ढवळे, शॉपिंग सेंटर लिपिक चेतन चव्हाण आरोग्य अधिकारी शरद वाघमारे,अनिल अभंगराव, उमेश कोटगिरी, समीर शेंडगे व सर्व वसुली टीम उपस्थित होते.



# मेळाव्यासाठी राजपूत समाज एकवटला

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** पुढील महिन्यात छत्रपती संभाजीनगर येथे राजपूत समाजाचा महामेळावा ३० एप्रिल रोजी आहे.
या संदर्भात सोमवार (ता,२७)रोजी फुले-शाहू-आंबेडकर सभागृहात छत्रपती संभाजीनगरचे प्रसिद्ध डॉ. जीवन राजपूत, व से.नि.पोलीस अधिकारी महीपालसिंह चांदा यांच्या उपस्थितीत शहर व तालुक्यातील राजपूत-परदेशी समाजाच्या सदस्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत वैजापूर शहर व तालुक्यातून दहा हजार पेक्षा जास्त नागरिक जाणार असल्याचे ठरले, ४एप्रिल पासून तालुक्यातील गावा-गावात जाऊन मेळावा जागृती करण्यासाठी दौरे आयोजित करण्यात आलेले आहे. यासाठी समिती गठित करण्यात आलेली आहे. भागवत बिघोत यांनी समितीचा कार्यक्रम निश्चित केला व प्रास्ताविक केले, आहे. याप्रसंगी डॉ. जीवन राजपूत,महीपालसिंह चांदा, राजुसिंह राजपूत, खुशालसिंह राजपूत, डॉ. विठ्ठलसिंह ढाकरे, ॲड. धरमसिंह राजपूत, धोंडीरामसिंह राजपूत, सतपालसिंह राजपूत, भगवानसिंह राजपूत, राजपूत युवक क्षत्रिय संघटनेचे धीरज सिंह राजपूत, प्रेम राजपूत, स्वप्नील राजपूत, भगतसिंह राजपूत, पवन राजपूत, राजूसिंह जोगीलाल राजपूत यांनी सूचना मांडल्या.
यामेळाव्यासाठी संपूर्ण वैजापूर शहर व तालुक्यातील समाज एकवटला असून मेळावा यशस्वी करण्याचा निर्धार सर्वांनी केला. या प्रसंगी सचिन राजपूत, सुभाष काकरवाल, प्रमोद उसारे, घनश्याम राजपूत,मनजूषा ढाकरे, समाजातील युवा वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# ज्येष्ठ पत्रकारांना दरमहा पाच हजार मानधन देणार

## नाना कांबळे : पिंपरी चिंचवड पत्रकार संघ देशातील पहिला पत्रकार संघ

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे सदस्य असलेल्या वय वर्ष साठ वर्षावरील ज्येष्ठ पत्रकारांना दरमहा किमान पाच हजार रुपयाचे मानधन देण्याची घोषणा मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव नाना कांबळे यांनी केली. पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड झाल्यानंतर नाना कांबळे बोलत होते. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे निवडणूक अधिकारी बाळासाहेब ढसाळ, पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे नूतन अध्यक्ष प्रवीण शिर्के, मावळते अध्यक्ष अनिल वडघुले, डिजिटल मीडियाचे नूतन अध्यक्ष प्रशांत साळुंखे, कार्याध्यक्ष अविनाश अदक, सरचिटणीस रोहित खर्गे, डिजिटल मीडियाचे कार्याध्यक्ष राजू वारभुवन, उपाध्यक्ष माधुरी कोराड,



गणेश मोरे, कोषाध्यक्ष राम बनसोडे व पत्रकार संघाचे सदस्य उपस्थित होते. यावेळी बोलताना नाना कांबळे म्हणाले की, पत्रकार संघाच्या साठ वर्षावरील ज्येष्ठ सदस्यांना पिंपरी चिंचवड पत्रकार संघ दरमहा किमान पाच हजार रुपयांचे मानधन देणार आहे, असा उपक्रम राबविणारा पिंपरी चिंचवड पत्रकार संघ हा देशातील एकमेव पत्रकार संघ ठरणार आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, विश्वस्त किरण नाईक, मराठी पत्रकार परिषदेचे राज्याचे अध्यक्ष शरद पाबळे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे पश्चिम महाराष्ट्राचे निमंत्रक गोविंद वाकडे या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पत्रकार संघ भक्कमपणे वाटचाल करत आहे. पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या वतीने लवकरात लवकर पत्रकार भवन च्या भूमिपूजनाचे नियोजन करण्यात येणार असून पत्रकार कॉलनी साठी शासनाकडे पाच एकर जागेची मागणी करण्यात आली आहे ही जागा प्राप्त झाल्यानंतर जवळपास ८० पत्रकारांना स्वतंत्र बंगले बांधून देण्याचा मनोदय असल्याचेही नाना कांबळे यांनी सांगितले. तसेच पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या वतीने देशातील पहिले प्रिंट, डिजिटल व इलेक्ट्रॉनिक माध्यमाचे महाविद्यालय उभे करण्याचा मनोदय ही नाना कांबळे यांनी व्यक्त केला. पिंपरी चिंचवड पत्रकार संघाने नोव्हेंबर महिन्यामध्ये राज्यस्तरीय अधिवेशन यशस्वीपणे पार पाडले त्याच धर्तीवर नजीकच्या काळात महिला पत्रकारांचे राष्ट्रीय अधिवेशन भरविण्याचा प्रयत्न असून देशभरातील महिला पत्रकारांना या अधिवेशनासाठी निमंत्रित करण्यात येणार आहे. पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या वतीने येत्या महिनाभरात पत्रकार प्रशिक्षण उपक्रम अंतर्गत आठ दिवसाचा प्रमाणपत्र प्रशिक्षण अभ्यासक्रम राबविण्याचे निश्चित केले आहे यासाठी अनेक मान्यवर पत्रकार मार्गदर्शन करण्यासाठी येणार असल्याचेही नाना कांबळे यांनी यावेळी सांगितले.

# वैजापूरात जगदंबा देवीयात्रा उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वैजापुरचे वैभव व साडेतीन शक्तीपीठ असलेले ग्रामदैवत श्री जगदंबा देवी यात्रा चैत्र शुद्ध पंचमीला उत्साहात पार पडली. समस्त गावकरी, शहर वाशी व यात्रा कमिटीने या कार्यक्रमाची नियोजन बद्ध आखणी केली होती, या निमित्ताने भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली, गावचे पाटील गुलाबराव साळुंके व जेष्ठ नागरिक यांच्या हस्ते देवी पालखी-तिल मूर्तीची पूजा करण्यात आली या समयी मुख्य पुजारी राजू राजस व त्यांचे कुटुंबीय जयंत इनामदार,
रमेश जोशी, किशोर राजस, श्याम राजस, अरुण राजस यांनी विधिवत पूजा केली. यावर्षी पालखी मिरवणूकित आदिवासी भोवाडे, नृत्य व पक्षी तसेच महिषासुर मर्दनी व नवदुर्गा देखावा सादर करण्यात आला होता. याशिवाय पारंपरिक नगारा वाद्य, शहरातील ब्रास बँड, यांनीही यावर्षी पालखी मिरवणूकित चैतन्य व उत्साह आणला. सायंकाळी पांच वाजता निघालेली मिरवणूक रात्री साडे दहा वाजता देवी मंदिरात पोहचली तेथे देवीची महाआरती संपन्न झाली,या महाआरतीत शहरातील मान्यवर सहभागी झाले होते,शोभेची दारू ही या प्रसंगी सोडण्यात आली, अत्यंत उत्साह व आनंदात देवी उत्सव संपन्न झाला यावेळी वैजापूर शहरातील व परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पहूर पेठ येथे स्मशानभूमीतील अतिक्रमणाबाबत घंटानाद आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील स्मशानभूमी जवळील अतिक्रमण बाबत योग्य ती कार्यवाही न केल्यास जामनेर तालुक्यातील पहुर पेठ ग्रामपंचायत जवळ बेमुदत घंटानाद आंदोलन करण्यात येणार असून या संदर्भात पहुर पेठ ग्रामपंचायतला निवेदन देण्यात आल्याचे वाघुर विकास आघाडीचे सुकलाल बारी यांनी सांगितले.
पहुर पेठ ग्रामपंचायतला दिलेल्या निवेदनात म्हटले आहेत की, दिनांक १७ /२/२०२३ रोजी सुर्यवंशी बारी समाज व इतर समाज बांधवांनी आपणास वाघुर नदीमधील स्मशानभूमी जवळ होत असलेल्या अतिक्रमणा बाबत सूचना केली होती.
तरी आपण आपल्या स्तरावरुन सदरील अतिक्रमण होत आहे किंवा नाही हे समाधान कारक न सुचवल्यामुळे मी वरील अर्जदार या निवेदनाव्दारे सूचित करतो की २५/३/२०२३ पर्यंत होत असलेल्या अतिक्रमण बाबतीत योग्य ती कार्यवाही न केल्यास सूर्यवंशी बारी समाज व इतर समाज स्मशानभूमी करिता मी व सहकारी दिनांक २७/३/२०२३ पासून ग्रामपंचायत पहुर पेठ जवळ जागर घंटानाद बेमुदत आंदोलन करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे .
निवेदनाच्या प्रती तहसील कार्यालय जामनेर, पहुर पोलीस स्टेशन, पंचायत समिती जामनेर, ग्रामपंचायत उपसरपंच व सदस्य यांना पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. निवेदनावर वाघुर विकास आघाडीचे सुकलाल बारी, अरुण बारी, ईश्वर बारी, माधव बारी, अर्जुन बारी, एकनाथ बारी, प्रभाकर बारी यांच्या सह आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहे.

# पुष्कर बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने जयहिंद पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** २६ मार्च २०२३ रोजी जळगाव येथील मातृभूमी रेस्क्यू कमांडो फोर्सचे उत्तर महाराष्ट्र विभाग प्रमुख प्रदीप गोकुळ पाटील यांना रविवार दि. २६ मार्च २०२३ रोजी सायं ४ वा. ३० स्थळ साई कॉलनी,सावखेडा रोड पिंप्राळा जळगाव येथे जयहिंद पुरस्कार २०२३ देऊन गौरविण्यात आले.
हा पुरस्कार पुष्कर बहुउद्देशीय संस्था जळगाव यांच्या वतीने देण्यात आला . प्रदिप या तरुणाला समाजसेवा, देशसेवेचे अत्यंत येळ, जे तरुण पोलीस , आर्मी भरती करतात पण काही कारणाने भरती होत नसतात आणि असे तरुण डिप्रेशन मध्ये जातात व काही तरुण आत्महत्या कडे ही वळतात अनेक तरुणाना वर्दी अंगावर पावेशी वाटते पण वर्दी चे स्वप्न अपुरे राहतात . असल्या तरुणाना योग्य ते मार्गदर्शन करून त्यांना मातृभूमी कमांडो फोर्सच्या माध्यमातून घडवण्याचे कार्य हा अवली तरुण करीत आहे . असे अनेक तरुणांना घडवण्याचे कार्य त्यांनी केले आहे , व करीत आहेत . त्यांचे हे कार्य समाजाचा निरदर्शनात यावे आणि या कार्याची दखल पुष्कर बहुउदेशीय संस्था जळगाव यांनी घेतली. प्रदिप पाटील हे उत्तर महाराष्ट्रातील होतकरू, गरजु विध्यार्थ्यांसाठी ना नफा ना तोटा ततव्यावर पोलीस - आर्मी भरती पुर्व मार्गदर्शन अकॅडमी लवकरच सुरू करणार आहेत. यावेळी माजी शिक्षण अधिकारी सिद्धार्थ नेटकर व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते सन्मान मानपत्र देऊन भव्य सत्कार करण्यात आला .
संदीप पाटील ( आर्मी नाईक ) प्रकाश पाटील ( कवि ), सुनील भटकर( चित्रपट दिग्दर्शक ), यशवंत दापोरकर, ( दापोरेकर ज्वेलर्स चे संचालक ), तुषार सोनार ( सामाजिक कार्यकर्ते ), अरविंद काकडेजी,मा. आदिनाथ जाधव ( एन.डी.एफ. फोर्स इनव्हेस्टिगेटर चीफ ऑफिसर ), अभिजीत नलावडे ( एमसीएफ फोर्स चे संस्थापक अध्यक्ष ), संतोष वायदंडे ( एमसीएफ फोर्स चे सचिव ), रविंद्र कोळी( सामाजिक कार्यकर्ते ), विजयसिंग पाटील, जगदीश सोनवणे ( सामाजिक कार्यकर्ते ) उपस्थित राहून प्रदिप या तरुणाच्या पुढील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी


सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# शाहिरीतून राष्ट्रभक्ती जोपासणारा राजपूत परिवार

आधुनिक केसरी

**तब्बल तीन पिढ्या शाहिरीच्या माध्यमातून राष्ट्रभक्ती जोपासतात, शाहिरीला व्रत मानून आपल्या परिवाराचा सांस्कृतिक आणि देशभक्तीचा वारसा समृद्धपणे पुढे नेतात आणि ज्या परिवाराचा कुठेही साधा उल्लेख जरी निघाला तरीही त्या परिवाराचे देशाप्रतीचे योगदान आपसूकच नजरेसमोर येते आणि आज देखील तिसरी पिढी देखील घराघरात राष्ट्रभक्ती पोहचवत असतांना राजा शिवछत्रपतींचे चरित्र घराघरापर्यंत पोहचविण्याचे व्रतस्थ काम करते त्या राजपूत परिवाराचा इतिहास आणि त्यांचे शाहिरीच्या क्षेत्रातील कार्य अलौकिक आहे. कुठल्याही नफ्या तोट्याचा विचार न करता एखादा परिवार जेव्हा स्वतःला वाहून घेतो हेच मुळात अलीकडच्या काळात आश्चर्य वाटणारे आहे. पूर्वज जे काम करायचे ते काम अलीकडची पिढी आता करतांना दिसत नाही. त्यामुळे अनेक कला आता कालबाह्य होत चालल्या आहेत.**






सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

स्वातंत्र्यपूर्व काळात जन्मलेले शाहीर बाबूसिंग राजपूत यांनी आपल्या शाहिरी कलेच्या माध्यमातून शाहिरी जपतांना, शाहिरीच्या माध्यमातून देशावर जेव्हा जेव्हा संकट आले त्या त्यावेळी लोकांमध्ये स्फूर्ती निर्माण करण्याचे आणि लोकांना प्रेरणा देत देशप्रेम जागृत करण्याचे काम केले.१९२८ मध्ये जन्मलेल्या शाहीर बाबूसिंग राजपूत यांनी बालवयापासुन शाहिरीच्या कला जोपासली आहे. गोकुलसिंग क्षत्रिय यांच्या सारख्या रत्नपारखी कलावंताने बालवयातील शाहीर बाबूसिंग राजपूत यांच्यातील गुण हेरले आणि गुरू शिष्याच्या ह्या जोडीने १९५० ते १९६२ या काळात अवघा महाराष्ट्र पिंजून काढला. तर १९४२ चा चले जाव चा लढा असेल,सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद सेना असेल, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ,रझाकराविरुद्ध चे बंड, गोमांतकांचा मुक्ती संग्राम,ह्या काळात देखील शाहिरी च्या माध्यमातून त्यांनी लोकचळवळ उभी केली. 1949 ला मध्यप्रदेश ची राजधानी नागपूर होती. त्यावेळी मध्यप्रांताचे मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल हे गोकुलसिंग क्षत्रिय यांची शाहिरी पाहून प्रभावित झाले होते. त्याच कारणाने त्यांनी राज्यात समाजशिक्षणा च्या माध्यमातून त्यांनी सर्वप्रथम बुलडाणा येथे शिक्षण कलापथक शाखेची निर्मिती केली त्यात गोकुलसिंग यांचे सह बाबूसिंग राजपूत, शाहीर निवृत्ती घोंगटे, नकलाकार वा. द. आंबेकर,कुलट पाटील,दलाल अहिर होते. स्वातंत्र्यशाहीर स्वर्गीय बाबूसिंह राजपूत यांना तीन भाऊ. त्यांचा प्रपंच फार मोठा आहे- सहा मुलं, आज आपापल्या नोकऱ्या सांभाळत आपल्या वडिलांकडून मिळालेल्या अनुवंशिक कलेला न्याय देत आहेत. यांचे थोरले चिरंजीव स्वर्गीय उत्तमसिंह राजपूत हे दारूबंदी खात्यामध्ये अधिकारी होते. शाहीर सज्जनसिंह राजपूत हे आपल्या वडिलांच्या पुण्याईने विवेकानंद आश्रम येथे परमपूज्य शुकदास महाराज यांनी संस्थापित केलेल्या विवेकानंद आश्रमाद्वारे संचालित शाळेत संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत . त्यांच्यापेक्षा लहान बंधू उज्जैनसिंह राजपूत पोलीस अधीक्षक कार्यालय, बुलढाणा येथे कार्यरत आहेत. शाहीर कंचनसिंह राजपूत, भूमी अभिलेख कार्यालयात कार्यरत आहेत आणि शाहीर बाबूसिंह राजपूत यांची शाहिरी परंपरा अतिशय प्रभावीपणे पुढे नेण्याचं काम करीत आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक कलावंत त्यांना ओळखतो. ते गायक, वादक, शाहीर म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्यापेक्षा धाकटे बंधू कुंदनसिंह राजपूत पुण्यातील एका नावाजलेल्या कंपनीमध्ये इंजिनियर म्हणून काम करतात, तेही उत्तम गायक तथा वादक आहेत. स्वर्गीय शाहीर बाबूसिंह राजपूत यांचे सर्वात लहाने चिरंजीव करणसिंह राजपूत बुलढाण्यातील सहकार विद्या मंदिर या शाळेवर संगीत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते उत्तम गायक, वादक आणि एक प्रतिभासंपन्न कलावंत आहेत.

शाहीर बाबुसिंह राजपूत यांचे धाकटे बंधू शाहीर मन्नूसिंह राजपूत हे सुद्धा त्यांच्याच संचात हार्मोनियम वादक म्हणून असायचे. त्यांना दोन मुलं. श्री सुरेशसिंह राजपूत यांचा मुलगा गजेंद्रसिंह हा उत्तम तबला, ढोलक वादक आहेत. त्यांच्यापेक्षा धाकटे बंधू, श्री अजयसिंह राजपूत. हे सगळ्या कुटुंबाचे मार्गदर्शक म्हणून सर्व भावंडांच्या मागे खंबीरपणे उभे असतात. शाहीर बाबूसिंह राजपूत यांच्या निधनानंतर 6 जानेवारी 1988 पासून तर सहा जानेवारी 2023 पर्यंत, शाहीर बाबूसिंह राजपूत यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम बुलढाण्याला साजरा होतो. महाराष्ट्रातील नामवंत शाहीर, कीर्तनकार, गायक तसेच वक्ते यांचे कार्यक्रम घेणे आणि सगळ्याच कार्यक्रमात अजयभाऊचे मोलाचे योगदान आणि मार्गदर्शन आजतागायत ह्या भावंडांना मिळते आहे. एकूणच राजपूत परिवाराचे मार्गदर्शक म्हणून मोठी जबाबदारी ते पार पाडतात.

अजयसिंह यांना तीन मुलं अक्षयसिंह, आनंदसिंह, अनुजसिंह... अक्षय सिंह फार मोठा कलावंत आहे एक वादक म्हणून सुप्रसिद्ध आहे. तबला, ढोलक, ढोलकी तसेच कोणतेही चर्मवाद्य अतिशय तयारीने हाताळतो. युवा सिंगर एक नंबरचा तो महाविजेता आहे. एका चांगल्या शिक्षण संस्थेमध्ये जळगाव येथे संगीत शिक्षक म्हणून काम करतो. रेवणसिंह राजपूत हे शाहीर बाबूसिंह राजपूत यांचे सर्वात छोटे बंधू त्यांना तीन मुलं. रणजितसिंह राजपूत ( पत्रकार ) गुड इव्हनिंग सिटी या सायंदैनिक चे संस्थापक संपादक म्हणून कार्य करीत आहेत. तर ते उत्कृष्ट सूत्रसंचालक पण आहेत. त्यांचे धाकटे बंधू मंजीतसिंह राजपूत हे पाटबंधारे विभागात कार्यरत आहेत तर सगळ्यात धाकटे बंधू सुजितसिंह राजपूत हे स्थानिक बँकेत कार्यरत आहेत. भारतीय शास्त्रीय संगीतामध्ये जशी पंजाब, किराणा घराणी आहेत... तसाच हा महाराष्ट्रातील राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या विदर्भाच्या शाहिरीचा राजपूत घराणा आजपर्यंत शाहिरीतून समाज प्रबोधनाच्या प्रांतात कार्यरत आहे. शिवशाहीर विक्रांतसिंह राजपूत त्याच उमेदीने आपला पारंपारिक शाहिरी वारसा पुढे नेत आहेत. बाबूसिंग राजपूत हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा गौरव होते. शिष्यांना शाहिरी शिकविताना हृदयविकार चा झटका येऊन त्यांनी आपला देह त्यागला. राजपूत परिवार आणि महाराष्ट्र गीत जय जय महाराष्ट्र माझा,गर्जा महाराष्ट्र माझा ह्या गीताला नुकताच महाराष्ट्र गीताचा दर्जा मिळाला आहे. राजा बढे यांची रचना असणाऱ्या महाराष्ट्र गीताला शाहीर साबळे यांनी सर्वदूर पोहचविलेले असतांना दुसरीकडे मात्र मातृतीर्थ बुलडाणा जिल्ह्यातील राजपूत परिवाराने जिल्ह्यात आणि संबंध महाराष्ट्रात ह्या गीताला सर्वच कार्यक्रमात गाऊन प्रत्येक कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने केली आहे. महाराष्ट्राचा इतिहास, वैभव,शूरता,संस्कृती दाखवत महाराष्ट्राचे यथोचित वर्णन ह्या गीतात असून ह्या गीताला कुठल्याही महत्वाच्या कार्यक्रमात अगदी सुरुवातीलाच गाऊन अंगावर रोमांच उभ्या करणाऱ्या राजपूत परिवाराने ह्या गीताची उंची शाहीर साबळे नंतर आपल्या शाहिरीतून अधिकच वाढविण्याचे काम केले आहे.

स्व शाहीर बाबूसिंग राजपूत यांनी सर्वप्रथम जून १९७४ साली सिंदखेडराजा येथे हे महाराष्ट्र गीत गायले होते. श्रीमती शालिनीताई पाटील यांनी त्यांना ग्रामोफोन वर हे गीत ऐकवून कुठल्याही कार्यक्रमात हे गीत गात जा असे सांगितले आणि तेव्हापासून कुठल्याही कार्यक्रमात स्व शाहीर बाबूसिंग राजपूत पासून तर अलीकडच्या विक्रांत राजपूत पर्यंत राजपूत परिवार कुठल्याही कार्यक्रमाची सुरुवात ह्याच महाराष्ट्र गीताने करत आला आहे.

विशेष म्हणजे शाहीर साबळे जेव्हा बुलडाणा येथे आले होते,तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी सज्जनसिंह राजपूत यांनी त्यांच्यासाठी महाराष्ट्र गीत गाऊन त्यांचे स्वागत केले होते तर शाहीर साबळे यांनी सज्जनसिंह राजपूत यांच्या पाठीवर शाबासकीचा हात टाकून कौतुक केले होते.

स्व. अटलबिहारी वाजपेयी, शरदचंद्र पवार, स्व. वसंतदादा पाटील,स्व. बाबासाहेब भोसले,स्व. शंकरराव चव्हाण, शिवाजीराव पाटील निलंगेकर,स्व. विलासराव देशमुख राज्याचे आतापर्यंत चे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री वसंत साठे,अजित पांजा,स्व. शिवाजीराव पाटील तपोवनकर,एव्हढेच काय तर मेहकर येथे ११ नोव्हेंबर २००५ रोजी लोणारवेस येथील मारोती कॉम्प्लेक्स मध्ये देशोन्नती संपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला होता,त्यावेळी देशोन्नती चे चीफ इन एडिटर लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे,आवृत्ती संपादक राजेश राजोरे यांच्या समोर त्या सोहळ्यात महाराष्ट्र गीताने प्रकाशभाऊ पोहरे यांच्या सह मान्यवरांच्या मनाचा ठाव घेतला होता.

तत्कालीन उपमुख्यमंत्री छगन भुजबळ,अजित दादा पवार, पदमभूषण डॉ प्रकाश बाबा आमटे,ह्या सर्वांनी शाहीर कंचनसिंह राजपूत,सज्जनसिंह राजपूत, विक्रांत राजपूत ह्या राजपूत परिवारातील शाहिरांनी महाराष्ट्र गीत गायले आहे
हीच शाहिरी परंपरा तिसऱ्या पिढीतील विक्रांत आणि अक्षय समर्थपणे पुढे नेत आहेत हे विशेष.



## धनराज गोंडाणे राजा ढाले पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** बौद्ध साहित्याचे गाढे अभ्यासक धनराज गोंडाणे यांना नुकताच जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपुर यांचे विद्यमाने राजा ढाले राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. हा सोहळा २६ मार्च रोजी विदर्भ हिन्दी साहित्य संमेलन मधुरम सभागृह मोर भवन नागपूर येथे संपन्न झाला.सामाजिक कार्यकर्त धनराज गोंडाणे यांनी लिहिलेल्या 'धम्म संस्कार संस्कृती' या ग्रंथाला राजा ढाले राज्यस्तरिय पुरस्काराने सन्मानित केले. हा पुरस्कार ख्यातनाम विचारवंत डॉ. श्रीपाल सबनिस, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दीपक कुमार खोब्रागडे, डॉ. के. पी. वासनिक दिल्ली, मल्वेश चौगुले बेळगांव, डॉ. जगन कराडे कोल्हापुर, डॉ. मधुकर वानखेडे दिल्ली, ॲड. भुपेश पायल चिमुर, रविंद्र तिरपुडे, सुजित मुरमाडे आदी विचारपीठावर उपस्थित होते. धनराज गोंडाणे यांना यां पूर्वी देखील अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांचे सामाजिक कार्य, बौद्ध धम्माचा प्रचार, व साहित्य लेखनासाठी आतापर्यंत समाजाने पुरस्कार देऊन कामाची पावती दिलेली आहे. या पुरस्काराबद्दल स. सो. खंडाळकर, भिमराव सरवदे , डॉ. यशवंत खडसे, डॉ. आर. के. क्षिरसागर, पत्रकार रतनकुमार साळवे, चंद्रशेखर गजभिये, वासुदेव मेश्राम, सिद्धार्थ डोंगरे, मधुकर गायकवाड, भास्कर म्हस्के आदींनी त्यांचे मनपूर्वक अभिनंदन केले. तसेच सामाजिक सर्वच स्तरातून सुद्धा अनेक मान्यवरांकडुन गोंडाणे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर